रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८७ | अंक २९४ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

# कृषीवल

रायगड, रविवार, दि. ३१ मार्च २०२४

किंमत ४ ₹

## ई-रिक्षांच्या पावत्यांमध्ये घोळ

**माथेरान :** माथेरानमध्ये सध्या पायलट प्रोजेक्टवर ई-रिक्षाचा प्रकल्प सुरू आहे. श्रमिक हातरिक्षा चालकांनी मागणी करूनदेखील हा प्रकल्प सनियंत्रण समितीच्या आडमुठ्या धोरणामुळे ठेकेदाराला देण्यात आला आहे. ६०/४० प्रमाणे हा ठेका नगरपरिषदेच्या माध्यमातून सुरू आहे; परंतु प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या पावत्यांमध्ये घोळ असल्याची बाब येथील माजी नगरसेवक दिनेश सुतार यांनी निदर्शनास आणून दिली. आजवरच्या या पायलट प्रोजेक्टमध्ये ठेकेदाराच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर आर्थिक अफरातफर झाल्याचा आरोप सुतार यांनी केला आहे. पान २ वर

## शरद पवार गटाचे शिलेदार ठरले

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने लोकसभा निवडणुकीसाठीची पहिली यादी शनिवारी जाहीर करण्यात आली. यात दिंडोरी, बारामती, वर्धा, शिरुर आणि अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघांतील उमेदवारांचा समावेश आहे.

शरद पवार यांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी या उमेदवारांची घोषणा केली. पक्षाच्या पहिल्या यादीत दिंडोरीतून भास्कर भगरे, बारामतीतून तिसऱ्यांदा सुप्रिया सुळे, वर्धेतून अमर काळे, शिरुर म्हणून दुसऱ्यांदा डॉ.अमोल कोल्हे यांना, तर अहमदनगर दक्षिण म्हणून निलेश लंके यांना उमेदवारी देण्यात आली आहे. लंके यांनी शुक्रवारीच आमदारकीचा राजीनामा दिला होता.

# तटकरेंनी ‘धैर्य’ खचवलं

## भाजपाला करावा लागणार तटकरेंचा प्रचार

आविष्कार देसाई

रायगड

जिल्ह्यातील भाजपामधून उमेदवारीला होणारा विरोध अखेर सुनील तटकरेंनी भाजपाच्याच वरिष्ठांना हाताशी घेत हाणून पाडला आहे. ‘साप भी मर गया और लाठीभी नही तुटी’, असेच काहीसे घडले आहे. त्यामुळे धैर्यशील पाटील यांची चांगलीच अडचण झाली असून, त्यांना तोंड दाबून बुक्क्यांचा मार खावा लागत असल्याचे चित्र आहे.



### धैर्यशील पाटलांची पंचाईत

तटकरेंना निवडून आणण्यासाठी धैर्यशील पाटील यांनादेखील मदत करावी लागणार आहे. धैर्यशील पाटील यांना रायगड लोकसभेची उमेदवारी देण्यात येणार असल्याच्या बोलीवर ते भाजपात गेले होते. मात्र, त्यांना उमेदवारी मिळाली नाही. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, धैर्यशील पाटील यांना पुढील कालावधीत राज्यसभेवर घेण्याची तयारी भाजपाने केली आहे. एकूणच काय तर, भाजपाने पाटील यांची चांगलीच पंचाईत करुन ठेवल्याचे चित्र आहे.

### महायुतीमधील मतभेद दूर?

रायगड लोकसभेच्या जागेवरुन महायुतीमध्ये असणारे मतभेद आता दूर झाले आहेत. भाजपाची सर्वच मंडळी धैर्यशील पाटील यांच्यासह माझ्या प्रचाराला सुरुवात करतील, असे सुनील तटकरे यांनी सांगितले.

लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे सुनील तटकरे यांच्या नावावर शनिवारी भाजपाच्या प्रमुख नेत्यांच्या उपस्थित शिक्कामोर्तब झाले. यावेळी भाजपाचे इच्छुक उमेदवार धैर्यशील पाटीलदेखील उपस्थित होते. भाजपामधील सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनीदेखील युती धर्म पाळण्याचे मान्य केल्याचे भाजपा पेणचे आमदार रवींद्र पाटील यांनी ‘कृषीवल’शी बोलताना स्पष्ट केले.

धैर्यशील पाटील यांनीदेखील आता तटकरेंच्या प्रचारासाठी मैदानात उतरावे, असे आदेश भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावणकुळे यांच्यासह मंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिले आहेत. भाजपाच्या या पान २ वर

# भाच्याच्या लग्नाहून परतताना काळाचा घाला

| उरण | वार्ताहर |

पनवेल खांदा गावातून आपल्या भाच्याच्या लग्न समारंभातून परतताना मामाचा अपघातात मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. शनिवारी (दि.३०) चिर्ले (अटल सेतू) या पळस्पे-जेएनपीए महामार्गावर दुपारी तीनच्या सुमारास हा भीषण अपघात झाला. यावेळी अपघात स्थळावर संतप्त झालेल्या नागरिकांनी रास्ता रोको केला.

मिळालेल्या माहितीनुसार, उरण तालुक्यातील मोठी जुई गावातील माजी उपसरपंच वसंत तुळशीराम भोईर हे शनिवारी पनवेल येथील खांदा गावातून आपल्या भाच्याच्या लग्न समारंभातून पळस्पे-जेएनपीए महामार्गावरून आपल्या मोटारसायकलवरुन मोठी जुई गावाकडे दुपारी तीनच्या सुमारास येत होते. वसंत भोईर हे मुंबई शहराकडे जाणाऱ्या अटल सेतू या चिर्ले गावाजवळील उड्डाण पुलाजवळ आले असताना महामार्गावर बेकायदेशीर पार्किंग केलेल्या मालवाहू ट्रेलरला त्यांच्या मोटारसायकने धडक दिली. यावेळी झालेल्या अपघातात वसंत भोईर हे जागीच मृत्युमुखी पडले. या अपघाताची माहिती मिळताच संतप्त झालेल्या नागरिकांनी रास्ता रोको केला आहे.



### मामाचा जागीच मृत्यू

## चौघांना मरणोत्तर भारतरत्न प्रदान

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

माजी पंतप्रधान पी.व्ही. नरसिंह राव, माजी पंतप्रधान चौधरी चरणसिंह, कृषी क्षेत्रात क्रांती घडवणारे डॉ. एम.एस. स्वामीनाथन आणि बिहारचे माजी मुख्यमंत्री कर्पुरी ठाकूर यांना शनिवारी (दि. ३०) मरणोत्तर भारतरत्नाने सन्मानित करण्यात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते त्यांच्या कुटुंबियांनी हा देशाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार स्वीकारला.

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी यांनाही शनिवारीच भारतरत्न पुरस्कार देण्यात येणार होता. मात्र, प्रकृतीच्या कारणास्तव ते राष्ट्रपती भवनामध्ये उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांना उद्या ३१ मार्च रोजी घरी जाऊन सन्मानित केले जाणार आहे. अडवाणी यांच्याव्यतिरिक्त उर्वरित चौघांना मरणोत्तर भारतरत्नाने पान २ वर

**नरसिंह राव, चरणसिंह, कर्पुरी ठाकूर, स्वामीनाथन यांचा समावेश**



## ‘कोणाला पाडायचे, त्यांना पाडा’

**जालना :** प्रत्येक गावातून आलेल्या अहवालातून अपक्ष उमेदवार देता येणार नाही. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत मराठा समाजाने पडण्याची गरज नाही. परंतु, ज्याला पाडायचे आहे, त्यांना पाडा, असे आवाहन शनिवारी (दि. ३०) जरांगे पाटील यांनी केले. ते अंतरवाली सराटीत पत्रकारांशी संवाद साधत होते.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, राजकारण हा माझा विषय नाही, मात्र समाजाची इच्छा आहे, म्हणून लोकसभा निवडणुकीबाबत निर्णय घेण्यात आला आहे. पान २ वर

## शरद पवारांकडून पाटील कुटुंबियांचे सांत्वन



| अलिबाग | प्रतिनिधी |

राष्ट्रवादीचे नेते खा. शरद पवार यांनी सपत्नीक शनिवारी (दि. ३०) पाटील कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली. पेझारी येथील त्यांच्या राहत्या घरी जाऊन मीनाक्षी पाटील यांच्या प्रतिमेला अभिवादन करून पाटील कुटुंबियांची विचारपूस केली.

त्यांच्यासोबत शरद पवार यांच्या पत्नी प्रतिभा पवार, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, शेकापचे पान २ वर

(संबंधित वृत्त पान ३ वर)

> नारायण नागू पाटील, प्रभाकर पाटील तसेच जयंत पाटील यांनी शाहू, फुले, आंबेडकरांची विचारधारा पुढे नेण्याचे काम केले आहे. तेच काम मीनाक्षीताईंनीदेखील अगदी खंबीरपणे केले. महाराष्ट्राच्या विधिमंडळात काम करीत असताना रायगडच्या विविध प्रश्नांची सोडवणूक करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. कॅन्सरसारख्या दुर्धर आजारावरही त्यांनी मात करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचे फार मोठे नुकसान झाले आहे. ही पोकळी कधीही न भरून निघणारी आहे.
>
> – खा. शरद पवार, अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट

## आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश

**अलिबागमधील घरफोडी उघडकीस**



| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबागमध्ये झालेल्या घरफोडीचा गुन्हा रायगडच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने उघडकीस आणला. घरफोडी करणाऱ्या आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश करून त्यांच्याकडून सात लाख रुपयांचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

अलिबागमध्ये काही दिवसांपूर्वी घरफोडीचा गुन्हा दाखल झाला होता. हा गुन्हा अलिबाग पोलिसांकडून पान २ वर



# उल्हास नदीला जलपर्णीचा विळखा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**खंडाळा येथे बोरघाटात उगम पावलेल्या उल्हास नदीला जलपर्णीच्या विळखा पडला आहे. नदीमध्ये ज्या ज्या ठिकाणी पाणी साठून राहिले आहे, त्या ठिकाणी जलपर्णीमुळे नदीच्या पाण्यावर हिरवी शेती केल्याचा चित्र दिसून येत आहे. जलपर्णीमुळे नदीचे पाणीदेखील प्रदूषित होत असून, जलपर्णीमुळे नदीचे प्रदूषण वाढले आहे. दरम्यान, या जलपर्णीने पाण्यावर हिरवा तवंग निर्माण झाला असून, परिणामी नदीच्या पाण्यातील जीवांना ऑक्सिजन मिळणे कठीण झाले आहे.**



उल्हास नदीचे पाणी हे ठाणे जिल्ह्यातील पिण्याचे पाणी म्हणून वापरात आणले जाणारे पाणी आहे. त्या पाण्यामध्ये सांडपाणी वाहून जात असल्याने नदीचे पाणी सातत्याने प्रदूषित होत असल्याची बोलले जात आहे. कर्जतपासून उल्हास नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणात सांडपाणी सोडले जात असल्याने कर्जतपासूनच उल्हास नदी प्रदूषित झाली आहे. त्यामुळे जानेवारी महिन्यापासून कर्जत तालुक्यातून वाहणाऱ्या उल्हास नदीच्या पाण्यात हिरवेगार तवंग दिसून येत होते. आता तर ठाणे जिल्ह्यात हे हिरवे तवंग जाऊन पोहोचले असून, उल्हास नदीमध्ये बदलापूर शहरातील भागात मोठ्या प्रमाणात पाण्यावर जलपर्णी उगवली आहे. या जलपर्णीबद्दल पर्यावरण प्रेमी यांच्याकडून नाराजी व्यक्त होत असून, उल्हास नदीचे प्रदूषण थांबवावे, असे मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. तरीदेखील स्थानिक प्रशासनाकडून उल्हास नदीचे प्रदूषण थांबवावे यासाठी केवळ कागद नाचविण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे प्रशासनाच्या भूमिकेबद्दलदेखील नाराजी आहे.

उल्हास नदीच्या पाण्यावर जलपर्णी उगवल्या असल्याने त्याचा सार्वधिक परिणाम पाण्याखाली असलेली जीवांना सर्वाधिक धोका निर्माण झाला आहे. त्याचे कारण पाण्यातील त्या जीवांना ऑक्सिजन मिळणे कठीण होऊन बसले आहे. त्यामुळे काही ठिकाणी तर नदीमधील मासे हे मरून पाण्याबाहेर पडत असल्याचे चित्र आहे. तर, अन्य ठिकाणी मासे हे त्या पाण्याच्या बाहेर डोकावून सूर्यप्रकाश घेऊन पुन्हा पाण्यात गडब होऊन जगण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे उल्हास नदीच्या पाण्यावर निर्माण झालेल्या जलपर्णींना हटवण्याची मागणी पर्यावरणप्रेमींकडून केली जात आहे. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी याबाबत प्रशासन आणि राज्याचे मुख्यमंत्री या जलपर्णीबाबत काही निर्णय घेणार काय, याबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३१ मार्च
१) श्री. भाईलाल मनजी पटेल
श्रीबाग-२ अलिबाग, ३१-३-१९५९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**



**डॉ. अदिती संजीव शेटकर, वाढदिवस, अलिबाग**

# आम्हाला घर कधी मिळणार?

- **आदिवासी बांधवांचा प्रशासनास सवाल**
- **...अन्यथा निवडणुकीवर बहिष्काराचा इशारा**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत शहरातील भिसेगाव मधील आदिवासी बांधवांना घरकुल योजनेचा लाभ द्या अन्यथा निवडणुकीवर बहिष्कार टाकणार आहेत, असा इशारा कर्जत नगरपरिषद मुख्याधिकारी यांना निवेदन देऊन केला आहे. आदिम जमातीचे रहिवासी असलेल्या आदिवासी बांधवांना शबरी घरकुल योजनेचा देण्याची मागणी आहे.

मागील कित्येक वर्षांपासून पिढ्यान् पिढ्या भिसेगावमधील आदिवासीवाडी असून, ग्रामपंचायत काळापासून ते नगरपरिषद काळापर्यंत सदरील आदिवासी समाज या भागामध्ये राहात आहे. या भिसेगावातील वाडीमधील आदिवासी समाज वीटभट्टी कामगार तसेच मजूर म्हणून काम करून आपला उदरनिर्वाह करीत आहेत. त्यामुळे त्यांना आजपर्यंत स्वतःचे हक्काचे भक्कम घर बांधता आले नाही. ग्रामपंचायतीची नगरपरिषद होऊन सुमारे ३३ वर्षे होत आली तरी संबंधित विभागाला अथवा लोकप्रतिनिधींना आदिवासी भागात लक्ष देता आले नाही. त्यांच्या योजना राबविल्या नाही, ते सोयीसुविधांपासून वंचित राहिले आहेत. प्रत्येक गोष्ट दाद मागून घ्यावी लागते, ही नगरपरिषदेसाठी शोकांतिकेची बाब आहे. नगरपरिषदेला ३३ वर्षे होत आली असूनदेखील आजवर नगरपरिषदेमध्ये या आदिवासी बांधवांच्या घराकरिता कोणतीही योजना राबवण्यात आली नाही अथवा प्रयत्न करताना दिसून आले नाही. लोकप्रतिनिधींनी फक्त टेंडरकडेच लक्ष दिले, असा आरोप यावेळी करण्यात आला. जे मतदान करतात त्यांची फक्त निवडणूक प्रसंगी आठवण येते, इतर वेळी मात्र त्यांच्याकडे ढुंकूनही पाहिले जात नाही, असेही म्हटले आहे.

ग्रामपंचायतीमधील ग्रामीण भागात आदिवासी बांधवांना घरकुलाकरिता शासनाकडून निधी उपलब्ध केला जातो. नगरपरिषदेकडून हद्दीमधील या आदिवासीवाड्यांना अशा प्रकारची कोणतीही सवलत शासनाकडून मंजूर असूनदेखील राबवली जात नाही व ज्या पद्धतीने घरपट्टी अवाच्या सव्वा लावली असल्याने या आदिवासी बांधवांना शासकीय योजना तसेच शासकीय मदतच मिळत नसेल तर मतदान करण्याचा व मतदान करूनदेखील कोण दखल घेत नसेल तर आम्हाला निवडणूक नको, नेता नको, यासाठी बहिष्कार टाकतो, असे सुंदरा वाघमारे यांचे म्हणणे आहे.

## अपघातात स्कुटी चालकाचा मृत्यू

**पनवेल :** तालुक्यातील भोकरपाडा जुन्या मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरून जाणाऱ्या एका स्कुटीवरील चालकास अज्ञात वाहनाची धडक बसून झालेल्या अपघातात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. भूषण राजाराम कांबळे (३९) असे या मृत्यू झालेल्या चालकाचे नाव आहे. हे त्याच्या ताब्यातील स्कूटी क.एम एच ४६ बी.एस १०६० ने जुन्या पुणे-मुंबई द्रुतगती मार्गाने चौककडून पनवेलकडे जात अज्ञात वाहनाच्या चालकाने वाहन भरधाव वेगाने चालवून पाठीमागून धडक देऊन त्याचे मृत्यूस कारणीभूत झाला, तसेच त्यास कोणतीही वैद्यकीय मदत न देता पळून गेला म्हणून तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सक्तीच्या मालमत्ता करवसुलीला विरोध

- **पालिकेच्या विरोधात परिवर्तन सामाजिक संस्था आक्रमक**

**। पनवेल । वार्ताहर ।**

मालमत्ता कर वसुलीसाठी गेलेल्या पनवेल महानगरपालिकेच्या पथकाला कळंबोलीतून माघारी फिरावे लागले. मार्बल व्यावसायिक आणि परिवर्तन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष महादेव वाघमारे यांनी या सक्तीच्या वसुलीला विरोध तीव्र केल्याने ही घटना घडली आहे.

मार्बल मार्केटमधील दुकानातील ग्राहकांना पालिकेचे पथक हाताला धरून दुकानाच्या बाहेर काढत असल्याचा आरोपही यावेळी वाघमारे यांनी केला. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२८ अ नुसार पायाभूत सोयीसुविधांचा बदल्यात मालमत्ता कर पालिका वसूल करत आहे; मात्र मालमत्ता कराचे प्रकरण उच्च न्यायालयात न्याय प्रविष्ट असून, पनवेल महापालिका त्यात पक्षकार आहे. यावर जो न्यायालय निर्णय देईल, तो सर्वांसाठी बंधनकारक राहील. त्यामुळे महापालिकेने हुकूमशाही पद्धतीने मालमत्ता कर आकारू नये, असे वाघमारे यांनी महापालिकेच्या वसुली पथकाला यावेळी ठणकावून सांगितले. महापालिका प्रशासन शहरात नियमानुसार मालमत्ता कर वसूल करीत आहे. व्यापाऱ्यांनी माघारी धाडल्याबाबतची माहिती पथकाने आम्हाला दिलेली नसल्याची प्रतिक्रिया उपायुक्त कैलास गावडे यांनी यावेळी दिली.

## केंद्रीय सुरक्षा बलाच्या अधिकाऱ्याची फसवणूक

**पनवेल :** खारघर येथील केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाच्या एका अधिकाऱ्याला फोनवरून फसवणूक केल्याची घटना खारघरमध्ये घडली आहे.

खारघर येथील सेक्टर ३५ मध्ये केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाची वसाहत आहे. या वसाहतीमध्ये राहणाऱ्या एका अधिकाऱ्याने संबंधित फसवणुकीची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात नोंदविली आहे. एका मोबाइल फोनवरून आलेल्या संदेशाची पडताळणी करताना एका केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाचे महासंचालक यांचा फोटो व्हॉट्सअॅपवरील डीपीवर ठेवून त्यांची ओळख वापरल्याने ही तक्रार नोंदविण्यात आली आहे. संबंधित अनोळखी व्यक्तीने स्वतःची खरी ओळख न सांगता केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाचे महानिदेशक यांच्या ओळखीने फोनवरील व्यक्तीला तुम्ही कसे आहात असे विचारून त्यांची ओळख करून घेत होता. त्यामुळे इतर अधिकाऱ्यांनी या फोनवरील व्यक्तीचा शोध काढल्यावर त्याला केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाचे महासंचालक हे ओळखत नसल्याचे समोर आले. त्यामुळे याप्रकरणी खारघर येथे राहणाऱ्या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाच्या अधिकाऱ्याने पोलिसांत गुन्हा नोंदविला आहे.

## बलात्कारी नराधमाला जन्मठेप

- **एक लाखाचा दंडही ठोठावला**

**। पनवेल । वार्ताहर ।**

दहा वर्षांच्या मुलीवर बलात्कार करणाऱ्या शैलेंद्र लक्ष्मण सहानी याला पनवेल येथील न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा, एक लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे.

आरोपी शैलेंद्र आणि दहा वर्षीय अल्पवयीन मुलगी हे शेजारी राहतात. अल्पवयीन मुलीला शैलेंद्र याने २०१६ मध्ये पळवून नेऊन अत्याचार करून तिला ठार मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी नवी मुंबई पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. काही दिवसांत ही मुलगी आणि आरोपी झाशी रेल्वे स्टेशन येथे सापडले. पनवेल येथील विशेष पोक्सो न्यायालयात या खटल्याची सुनावणी पूर्ण झाली. सरकार पक्षातर्फे विशेष सरकारी वकील प्रतीक्षा वडे-वारंगे यांनी काम पाहिले. १३ साक्षीदार तपासण्यात आले. त्यामध्ये पीडित मुलगी, तिची आई, डॉक्टर जया श्रीनिवासन, तपासिक अधिकारी एच.बी. काळसेकर यांची साक्ष महत्त्वाची ठरली. प्रतीक्षा वडे-वारंगे यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून पनवेल विशेष सत्र न्यायाधीश शहिदा शेख यांनी आरोपी शैलेंद्र याला पोक्सो कायदा अन्वये जन्मठेप व एक लाख रुपयांचा दंड ठोठावला.

> **अल्पवयीन मुलीवर अत्याचार न्यायालयाने जन्मठेप आणि एक लाखांचा दंड ठोठावला. न्यायालयाने केलेल्या या शिक्षेमुळे असे कृत्य करणाऱ्यांना आळा बसेल आणि लहान मुलांवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला दहशत बसेल.**
> **- प्रतीक्षा वडे-वारंगे, सरकारी वकील**

# विद्यार्थ्यांकडून मतदारांमध्ये जनजागृती

**। पेण । प्रतिनिधी ।**

३२ रायगड लोकसभा मतदारसंघातील १९१ पेण विधानसभा मतदारसंघामध्ये सहायक निवडणूक अधिकारी प्रवीण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तानाजी शेजाळ तहसीलदार पेण, प्रसाद कालेकर नायब तहसीलदार पेण यांच्या निर्देशानुसार पेण तालुका स्वीप पथकाच्या मदतीने सौ. म.ना. नेने कन्या विद्यालय व प्रायव्हेट हायस्कूल पेण येथील प्रा. अंजली जोशी, शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थिनी यांच्यासोबत दि. २८ ते ३० मार्च मतदान जनजागृती बाबत रॅली काढण्यात आली व विद्यार्थ्यांना संकल्प पत्र वाटप करण्यात आले.



सदर संकल्प पत्र विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना देऊन मतदान जागृती करायवयाची आहे, असे आवाहन करण्यात आले. पेण तालुक्यातील जवळपास सर्वच कुटुंबात मुलांच्या माध्यमातून असे संकल्प पत्र पाठविण्यात येत आहे. तसेच नगरपालिका हद्दीतील घंटागाड्या, व आसपासच्या गावातील आंबेघर, डोलवी, मळेघर, दुष्मी, कांदळे, वडखळ, कामार्ली या ग्रामपंचायत घंटागाड्यांवर मतदान जनजागृतीसंदर्भात जिंगल्स, ध्वनीफीत दररोज वाजविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने नागरिकांमध्ये मतदानासंदर्भात जनजागृती करण्यात येत आहे. पेण शहरात तसेच गावांमध्ये विविध ठिकाणी पथनाट्याद्वारे मतदान जनजागृती करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यापूर्वी पतंगराव कदम कॉलेज पेण तसेच शासकीय विद्या निकेतन पेण येथे विद्यार्थ्यांची रॅली व ईव्हीएम मशीनचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले आहे. एकूणच, पेण तालुक्यात मोठ्या प्रमाणावर निवडणुकीचे वातावरण तयार व्हायला मदत होत आहे.

## पान १ वरून

### तटकरेंनी ‘धैर्य’ खचवलं

पवित्र्यामुळे धैर्यशील पाटील यांना मात्र चांगलेच तोंडावर आपटण्यास भाग पडले आहे. गेल्या काही दिवसांपासून महायुतीतून रायगड लोकसभेची जागा कोण लढवणार याबाबत संभ्रम निर्माण झाला होता. अजित पवार यांनी सर्वप्रथम सुनील तटकरे यांची उमेदवारी जाहीर केल्याने भाजपाच्या गोटात चांगलाच हादरा बसला होता. तटकरेंची उमेदवारी घोषित झाली असली, तरी अद्याप त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला नाही, असे सांगत भाजपाने तटकरेंपुढे आव्हान कायम ठेवले होते. अखेर हा वाद शनिवारी मुंबई येथे सोडवण्यात आला.

या बैठकीला चंद्रशेखर बावणकुळे, सुनील तटकरे, मंत्री रवींद्र चव्हाण, आमदार रवींद्र पाटील, रायगड लोकसभा अध्यक्ष सतीश धारप यांच्यासह रायगड जिल्ह्यातील भाजपाचे पदाधिकारी उपस्थित होते. मोदींना पुन्हा प्रधानमंत्रीपदी बसवण्यासाठी सर्वांनी एकत्रित काम करणे गरजेचे असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. यासाठी महायुतीचा धर्म म्हणून तटकरेंना निवडून आणण्यासाठी सर्वांनी मदत करावी, असे आवाहन बावणकुळे यांनी केले. मात्र, तटकरे यांनीदेखील आगामी काळात होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत भाजपाच्या उमेदवारांना मदत करावी, अशी अट काही पदाधिकाऱ्यांनी घातली. त्याला तटकरे यांनी होकार दिल्याचे सूत्रांनी सांगितले.

### चौघांना मरणोत्तर भारतरत्न प्रदान

सन्मानित करण्यात आले. माजी पंतप्रधान पी.व्ही. नरसिंह राव यांचा मुलगा पी.व्ही. प्रभाकर राव, एम.एस. स्वामीनाथ यांची मुलगी डॉ. नित्या राव, कर्पुरी ठाकूर यांचा मुलगा रामनाथ ठाकूर आणि चौधरी चरण सिंह यांचा नातू जयंत चौधरी यांनी राष्ट्रपतींच्या हस्ते भारतरत्न पुरस्कार स्वीकारला.

### पवारांकडून पाटील कुटुंबियांचे सांत्वन

नांदेड येथील आ. श्यामसुंदर शिंदे, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख आशा शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या, माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांच्या निधनाची माहिती कळताच राष्ट्रवादीचे नेते खासदार शरद पवार यांनी शनिवार (दि. ३०) मार्च रोजी शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील, आ. पंडित पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस अॅड. आस्वाद पाटील यांची अलिबाग तालुक्यातील पेझारी येथील त्यांच्या राहत्या घरी जाऊन सांत्वनपर भेट घेतली. त्यांची विचारपूस करण्यात आली. यावेळी जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, जिल्हा परिषद माजी सदस्य भावना पाटील, शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, जिल्हा परिषद माजी अर्थ सभापती चित्रा पाटील, सवाई पाटील आदी पाटील कुटुंबिय व कार्यकर्ते उपस्थित होते.

### आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश

प्रलंबित होता. रायगडच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने या गुन्ह्याचा तपास हाती घेतला. पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर जाधव, पोलीस उपनिरीक्षक धनाजी साठे, पोलीस हवालदार प्रतिक सावंत, जितेंद्र चव्हाण, बाबासो पिंगळे, रुपेश पिंगळे, पोलीस शिपाई अक्षय सावंत, सचिन वावेकर, भरत तांदळे, लालासाहेब वाघमोडे, अक्षय जगताप तसेच सायबर सेलचे पोलीस नाईक तुषार, पोलीस शिपाई अक्षय पाटील यांचे एक पथक तयार करण्यात आले. या पथकामामार्फत तपासाला सुरुवात करण्यात आली. वेगवेगळ्या खबऱ्यांमार्फत माहिती घेण्याचे काम पथकाने सुरु केले. अखेर सायबर सेलच्या मदतीने संशयित आरोपीला मध्य प्रदेशातील धारमधून उचलण्यात आले. पोलिसी दणका मिळाल्यावर त्याने घरफोडी केल्याचे कबूल केले. मडिया रायसिंग मकवाना असे या आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून सात लाख रुपयांचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले.

**गावठी बंदुकीसह काडतूस जप्त**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रायगड पोलिसांनी धाडसत्र सुरु केले आहे. जिल्ह्यात अवैध शस्त्र, अंमली पदार्थ, दारु विक्री, वाहतूक करणाऱ्यांवर लक्ष ठेवण्यास सुरुवात केली आहे. खालापूरमधील चौकफाटा परिसरात २८ मार्च रोजी अवैध गावठी बंदूक बाळगून एकजण फिरत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांना मिळाली होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सापळा रचून नरेश देशमुख याला मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले. त्याची कसून तपासणी केल्यावर त्याच्याकडे गावठी बंदूक आणि पाच जिवंत काडतूस आढळून आले. त्याच्याविरोधात खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

### ‘कोणाला पाडायचे, त्यांना पाडा’

गावागावातून आलेल्या अहवालानंतर निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी दिली.काहीजण उमेदवाराच्या नावाखाली वर्गणी जमा करत असतील, तर ही कृती योग्य नाही, असे सांगून या निवडणुकीत एक रुपयाही लागणार नाही. त्यामुळे असली दुकाने कोणीही सुरू करू नयेत. त्यांनी असे केले असेल, तर त्यांनी ते परत करावे, नाहीतर त्यांना मीडियासमोर वाजवल्याशिवाय राहणार नाही, असा सज्जड दमही कार्यकर्त्यांना जरांगे यांनी दिला आहे.

### ई-रिक्षांच्या पावत्यांमध्ये घोळ

दरम्यान, प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या पावत्यांवर शिक्केच काय, तर साधी तारीखदेखील नाही. तर, माथेरान नगरपरिषदेची मालमत्ता असलेले शिक्के हे ठेकेदाराच्या कर्मचाऱ्यांकडे मिळाले आहेत. ई-रिक्षाच्या उत्पन्नातून नगरपरिषद व ठेकेदार यांच्यात ६०/४० चा करार करण्यात आला आहे. मात्र, या रिकाम्या पावत्यांमुळे नगरपरिषदेचा आंधळा कारभार उघडा पडला आहे, असा आरोप माजी नगरसेवक दिनेश सुतार यांनी केला आहे. तर, सारवासारव करण्याचा नगरपालिकेचा प्रयत्न नसून, नगरपालिका प्रत्येक तक्रारीची दखल घेऊन निवारण करीत असल्याचे माथेरान नगरपरिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी सांगितले.



## परदेशी पाहुणेही रंगले रंगात

**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरानमध्ये पारंपरिक रंगपंचमी सण शनिवारी (दि. ३०) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी माथेरानमध्ये आलेल्या परदेशी पाहुण्यांनीदेखील रंगपंचमीचा मनमुराद आनंद घेतला. माथेरानमधील स्थानिकांबरोबर एकमेकांवर रंगांची उधळण केली.

माथेरानमध्ये अनेक वर्षांपासून होळीच्या पाचव्या दिवशी रंगपंचमीचा सण मोठ्या आनंदाने उत्साहाने साजरा करण्यात येतो. येथे असलेल्या कोकण व घाटावरील संस्कृतीनुसार येथे धुळवड साजरी न होता रंगपंचमी स्थानिकांसाठी मोठा उत्सव असतो. रंगपंचमीच्या दिवशी दुपारी मुख्य बाजारपेठेमध्ये सर्व स्थानिक एकत्र येत रंगपंचमीचा आनंद घेत असतात. यावेळी सर्वधर्मीय यामध्ये सामील होतात. यावेळी माथेरानमध्ये आलेल्या परदेशी पाहुण्यांनीदेखील रंगपंचमीचा आनंद घेतला.

## केजरीवालांच्या अटकेच्या निषेधार्थ निदर्शने



**। पनवेल । वार्ताहर ।**

‘मोदी हटाव, देश बचाव’ या घोषणांनी आपचे नेते, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अटकेच्या निषेधार्थ पनवेलमध्ये काँग्रेस आणि ऑल इंडिया ह्युमन राइट्स यांच्यावतीने निदर्शने करण्यात आली.

पनवेल शहरातील काँग्रेस भवन तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये ही निदर्शने करण्यात आली. मोदी सरकारने जाणीवपूर्वक अरविंद केजरीवाल यांना जेलमध्ये टाकले आहे, या घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला. यावेळी पनवेल शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सुदाम पाटील, ऑल इंडिया वुमन्स राईटच्या विनिता बर्फे, शेतकरी कामगार पक्ष पनवेल महानगरपालिका जिल्हा चिटणीस गणेश कडू तसेच युवा नेते हेमराज म्हात्रे, कामगार नेते वैभव पाटील, सुरेश पाटील, माजी नगरसेविका नगरसेविका शशिकला सिंह, सुधीर मोरे, शशिकांत बांदोडकर आदी उपस्थित होते.

# भामट्याकडून तरुणीला लाखोंचा चुना

- **लग्न जुळवण्याच्या नावाखाली फसवणूक**

**। पनवेल । वार्ताहर ।**

लग्न जुळवण्याच्या साईटवर स्वतःसाठी वर शोधण्याच्या प्रयत्नात असलेल्या २८ वर्षीय तरुणीकडून एका भामट्याने ६ लाख ३१ हजारांची रक्कम उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. नबील मुनीर खान (३०) असे या भामट्याचे नाव असून, खारघर पोलिसांनी त्याच्या विरोधात फसवणुकीसह आयटी अॅक्टनुसार गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेली २८ वर्षीय तरुणी खारघर परिसरात आईवडील व बहिणीसह राहण्यास आहे. ही तरुणी एका खासगी हॉस्पिटलमध्ये कार्यरत आहे. या तरुणीने वर्षभरापूर्वी स्वतःसाठी वर शोधण्यासाठी लग्न जुळवणाऱ्या वेबसाईटवर आपली नोंदणी केली होती. त्यानंतर नोव्हेंबर २३ मध्ये नबील मुनीर खान या भामट्याने या तरुणीसोबत ओळख वाढवली होती. त्यानंतर नबील याने या तरुणीसोबत व्हॉट्सअॅपवरून चॅटिंग तसेच बोलणे सुरू केले होते. तसेच त्याने तरुणीच्या वडिलांसोबत फोनवरून बोलणी करून त्यांच्या मुलीसोबत लग्न करण्याची इच्छादेखील व्यक्त केली होती. त्यावेळी भामट्या नबील याने त्याचे मूळ गाव महाड येथे असल्याचे व सध्या तो मुंब्रा येथे राहात असल्याचे सांगितले होते. तसेच त्याचा दक्षिण आफ्रिका देशात मायनिंगचा, तर मुंबईतील डोंगरी भागात टुर्स अॅण्ड ट्रॅव्हल्सचा व्यवसाय असल्याचे सांगून दहा तरुणींवर आपली छाप पाडली होती. त्यानंतर नबीलने तो दक्षिण आफ्रिकेत असल्याचे, भारतातील त्याचे बँक खाते फ्रीज केल्याचे तसेच बिझनेससाठी त्याला पैशांची गरज असल्याचे अशी वेगवेगळी कारणे सांगून तरुणीकडे पैशांची मागणी करण्यास सुरुवात केली.

नबील हा होणारा पती असल्याने या तरुणीनेदेखील त्याला सुरुवातीला १ लाख ३७ हजार रुपये ऑनलाइन पाठवून दिले. मात्र, त्यानंतर भामट्या नबीलने आईचे ऑपरेशन, भारतात येण्यासाठी विमान तिकिटासाठी तसेच व्यवसायामध्ये नुकसान झाल्याचे कारण सांगून तरुणीला वेगवेगळ्या व्यक्तींच्या बँक खात्यांत पैसे पाठवण्यास भाग पाडले.

अशा पद्धतीने तब्बल ६ लाख ३१ हजारांची रक्कम उकळली. मात्र, त्यानंतरदेखील भामटा नबील तरुणीकडून पैशांची मागणी करतच राहिल्याने तरुणीला त्याच्यावर संशय आला. त्यामुळे या तरुणीने त्याच्याकडे आपली रक्कम परत मागण्यास सुरुवात केली असता, त्याने टाळाटाळ करण्यास सुरुवात केली. त्याने तरुणीला ठार मारण्याची धमकी दिली. त्यानंतर या तरुणीने खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

निवडक

## नायक किरण कांबरी निवृत्त

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील पोशीर गावातील किरण कांबरी हे भारतीय सैन्य दलातील सेवेतून १९ वर्षांची सेवा बजावून घरी परतत आहेत. दरम्यान,त्यानिमित्ताने किरण कांबरी यांचे मिरवणूक काढण्यात येणार आहे. भारतीय सैन्यातील थळ सेनेत २००५ मध्ये रुजू झालेले किरण यांनी टेक्निकल ड्रॉफ्समन आणि नंतर नायक या पदावर १५ वर्षे सेवा बजावली.सर्व सेवेतून यशस्वी कामगिरी बजावून सैन्य दलाची सेवा पूर्ण करून आपल्या घरी गावी परतत आहेत.

## गुड फ्रायडेनिमित्त मिरवणूक

**रसायनी :** सेंट जोसेफ बिलिव्हर्स ईस्टर्न चर्च, मुंबई डायोसीज कोळखे यांनी गुड फ्रायडे पाळला आणि आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या वधस्तंभावरील मृत्यू आणि त्याच्या दफनविधीच्या स्मरणार्थ रसायनी येथे मिरवणूक काढली. गुड फ्रायडे हा लेंट सीझन आणि पवित्र आठवड्यातील पवित्र दिवस असल्याने प्रभु येशू ख्रिस्ताच्या वधस्तंभावरील मृत्यू आणि त्याचे दफन स्मरण इन करतो बिलिव्हर्स ईस्टर्न चर्च हिज ग्रेस मार्टिन मोर ऍप्रेम एपिस्कोपा, लोकांसाठी प्रार्थना केली.

## शिवजयंती उत्साहात साजरी

**उरण :** जाणता राजा सामाजिक विकास मंडळ बामणडोंगरी यांच्या विद्यमाने बामणडोंगरी गावात मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी करण्यात आली. सकाळी जाणता राजाचे दिवंगत सहकारी स्व.धनंजय म्हात्रे आणि स्व.निवास म्हात्रे यांच्या स्मरणार्थ रक्तदान शिबीर संस्थेच्या वतीने आयोजित केले होते. तसेच संध्याकाळी संपूर्ण बामणडोंगरी गावात छत्रपती शिवाजी महाराजांची ढोल-ताशांच्या गजरासह पालखी मिरवणूक काढण्यात आली.

## पद्मदुर्ग पथकाची निर्मिती

**मुरूड :** मुरुड शहरात व ग्रामीण भागात गणपती उत्सव तसेच राजकीय मिरवणूक, लग्न समारंभ अश्या अनेक कारणासाठी ढोल ताशा पथकाची नितांत गरज असते.ही गरज ओळखून पद्मदुर्ग ढोल ताशा पथक स्थापन करण्यात आले आहे.या पथकाचे अध्यक्ष दत्ता मुंगळे,उपाध्यक्ष नेहा पटेल,सचिव ईशान बागडे व आदित्य पाटील,खजिनदार अंकेष पाटील आहेत.तसेच या पथकात विविध वाद्य वाजवण्यासाठी ३५ सदस्य नियुक्त करण्यात आले आहेत.

## संस्कृत भारतीचा वार्षिकोत्सव

**माणगाव :** संस्कृत भाषेच्या प्रचार व प्रसारासाठी काम करणाऱ्या संस्कृत भारती कोकण प्रांत माणगाव बालकेंद्र शाखेचा वार्षिक उत्सव शिपुरकर विद्यालयात संपन्न झाला. या कार्यक्रमास माणगाव नगरपंचायत मुख्याधिकारी संतोष माळी, डॉ बेडेकर दाम्पत्य, नगरसेविका नंदीनी बामगुडे, देववाणी प्रमुख रायगड जिल्हा, बालकेंद्र शिक्षिका नेहा केकाणे, रायगड जिल्हा प्रमुख रेणूका पिंपळापुरे, सतीश केकाणे, अजित शेडगे आदी मान्यवर उपस्थित होते.

# मान्यवरांकडून पाटील कुटुंबियांचे सांत्वन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या, माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांच्या निधनाची माहिती कळताच वेगवेगळ्या क्षेत्रांतील मान्यवरांकडून पाटील कुटुंबियांचे सांत्वन करण्यात आले आहे. शनिवारी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह राजकीय, सामाजिक, क्षेत्रातील अनेक मंडळींनी पेझारी येथे जाऊन पाटील कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली.



मीनाक्षी पाटील यांचे शुक्रवारी सकाळी निधन झाले. त्यानंतर राजकीय तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शनिवारी पेझारी येथे त्यांच्या राहत्या घरी जाऊन पाटील कुटुंबियांची भेट घेतली. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, अनिल परब, आदिती तटकरे यांच्यासह गोपाळ अग्रवाल, सांगोल्यातील शेकापच्या कार्यकर्त्यांनी शनिवारी (दि.३०) पेझारी येथे जाऊन आ. जयंत पाटील, माजी आ. पंडित पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील यांची भेट घेत सांत्वन केले. यावेळी जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, जिल्हा परिषद माजी अर्थ सभापती चित्रा पाटील, जिल्हा परिषद माजी सदस्या भावना पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, युवा नेते सवाई पाटील, आंबेपूरच्या सरपंच सुमना पाटील आदी पाटील कुटूंबिय व कार्यकर्ते उपस्थित होते.





● राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह पत्नी प्रतिभा पवार यांनी शनिवारी (दि.३०) मीनाक्षी पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करीत अभिवादन केले. यावेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, आ. शामसुंदर शिंदे, आशा शिंदे तसेच पाटील कुटूंबिय उपस्थित होते.
(छायाचित्र : जीवन पाटील)

# मुद्रांक शुल्क ‘अभय’ योजनेला मुदतवाढ

■ जूनअखेरपर्यंत करता येणार अर्ज
■ पहिल्या टप्प्यात ४७३ प्रकरणे निकाली
■ ४७ कोटी २७ लाखांचा महसूल जमा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**राज्य सरकारने १९८० ते २०२० या कालावधीत दस्तनोंदणीवर कमी मुद्रांक शुल्क भरलेल्यांसाठी आणलेल्या दुसऱ्या टप्प्यातील ‘अभय’ योजनेला जूनअखेरपर्यंतची मुदतवाढ मिळाली आहे. मात्र दुसऱ्या टप्प्यातील योजनेत पहिल्या टप्प्यापेक्षा मुद्रांक शुल्क आणि दंडाच्या रकमेत मिळणारी सवलत कमी करण्यात आली आहे.या योजनेच्या पहिल्या टप्प्यात रायगड जिल्हा मुद्रांक शुल्क विभागाकडील ४७३ दाखल प्रकरणांमधून ४७ कोटी २७ लाख रुपयांचा महसूल जमा झाला.**




१९८० ते २०२० या कालवधीत सदनिका घेतली असेल. परंतु मुद्रांक शुल्क कमी भरले असेल, अथवा १० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर विक्री करारनामा केला, मात्र रजिस्टर करण्यासाठी प्रकरण दाखल केले नाही, अथवा बाजारभाव विचारात न घेता दस्तामध्ये दाखविलेल्या रकमेवरच मुद्रांक शुल्क भरले असले, अशा नागरिकांसाठी राज्य सरकारने ‘अभय’ योजना जाहीर केली आहे.त्यामध्ये १ जानेवारी १९८० ते ३१ डिसेंबर २००० या कालावधीसाठी एक आणि १ जानेवारी २००१ ते २०२० या कालावधीतील दस्तांसाठी एक, असे दोन गट तयार करण्यात आले आहेत. १ डिसेंबरपासून ३१ जानेवारी २०२४ आणि १ फेब्रुवारी २०२४ ते ३१ मार्च २०२४ अशा दोन टप्प्यांत ही योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेत राज्य सरकारकडून सवलतींचा वर्षाव करण्यात आला आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यातील योजनेला २९ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. ही मुदत संपुष्टात आली. आता दुसऱ्या टप्प्यातील योजनेला सुरुवात झाली आहे. या योजनेत अर्ज करण्यासाठी एका महिन्याची म्हणजे ३१ मार्चपर्यंत मुदत देण्यात आली आहे. मात्र या मुदतीत राज्य सरकारने अर्ज करण्यास मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे दुसऱ्या टप्प्यातील मुदत जूनअखेरपर्यंत असणार आहे. परंतु मुद्रांक आणि दंडाच्या रकमेत पहिल्या टप्प्यात जी सूट देण्यात आली होती, ती दुसऱ्या टप्प्यातील योजनेत कमी करण्यात आली आहे.

> **मुद्रांक शुल्क न भरलेल्या किंवा कमी मुद्रांक शुल्क भरलेल्या प्रकरणात नागरिकांना दिलासा देण्यासाठी अभय योजना राज्य सरकारने जाहीर केली आहे. दुसऱ्या टप्प्यातील योजनेची मुदत ३१ मार्च रोजी संपत होती. त्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. जून अखेरपर्यंत नागरिकांना अर्ज करता येणार आहे. नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा.६ डिसेंबर १९८५ पूर्वीच्या खरेदी-विक्री करारनाम्यांसाठी ही योजना लागू नाही. त्यांना तशी गरजही नाही. त्यामुळे आशा नागरिकांनी धावपळ करण्याची गरज नाही. मात्र, खरेदीखत अथवा डिड ऑफ अपार्टमेन्ट करावयाचे झाल्यास त्यांना मुद्रांक शुल्क भरावे लागणार आहे.**
> **-श्रीकांत सोनावणे,**
> **मुद्रांक जिल्हाधिकारी रायगड**

योजनेचा पहिला टप्पा २९ फेब्रुवारी रोजी संपला. या टप्प्यात ४७३ दाखल प्रकरणांमधून ४७ कोटी २७ लाख रुपयांचा महसूल जमा झाला. मात्र, मुद्रांक शुल्क आणि त्यावरील दंडाची एकत्रित रक्कम पाच कोटींपेक्षा अधिक असलेली प्रकरणे पूर्वमान्यतेसाठी राज्य शासनाकडे पाठविण्यात आली आहेत. योजनेचा दुसरा टप्पा १ ते ३१ मार्च असा होता. मात्र, नागरिकांचा या योजनेला मिळालेला उस्फूर्त प्रतिसाद पाहता दुसऱ्या टप्प्यालाही ३० जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

दुसऱ्या टप्प्यात मुद्रांक आणि दंडाच्या रकमेतली सवलत पहिल्या टप्प्याच्या तुलनेत कमी करण्यात आली आहे. या योजनेसाठी नागरिकांना नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाच्या संकेतस्थळावर अर्ज उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच कोणत्याही प्रकारच्या दस्तासाठी जिल्ह्यातील मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय येथे अर्ज करता येणार आहे.

# आरटीई प्रवेशासाठी लवकरच कार्यवाही

**। रायगड । प्रतिनिधी ।**

मोफत आणि सक्तीच्या शिक्षण हक्क अधिकार कायद्यानुसार प्रत्येक बालकाला शिक्षण हक्क मिळवून देण्यासाठी सर्व शाळांमध्ये आरटीईचे प्रवेश केले जाणार आहेत. त्यासाठी शिक्षण विभागाकडून नुकतीच ८४ हजार ४४६ शाळांपैकी ७५ हजार ८४८ शाळांची नोंदणी पूर्ण झाली आहे. आरटीईच्या प्रवेशसाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया आणि त्यासाठीची कार्यवाही सुरू केली जाणार असल्याची माहिती शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिली.

जूनपासून सुरू होणाऱ्या नवीन शैक्षणिक वर्षापासून राज्यातील सरकारी, अनुदानित आदी शाळांमध्येही आरटीईच्या प्रवेशाला प्राधान्य दिले जाणार आहे. एक किमी परिसरात असलेल्या सरकारी, अनुदानित शाळांच्या परिसरातील खासगी शाळांमध्ये आरटीईचे प्रवेश केले जाणार नसल्याने यावेळी आरटीई प्रवेशासाठी शाळांची संख्या ही ८४ हजार ४४६पर्यंत येऊन पोहोचली आहे. यातील ७५ हजार ८४८ शाळांची नोंदणी पूर्ण झाली असल्याने या शाळांमध्ये लाखो जागा आरटीई प्रवेशासाठी उपलब्ध होणार आहेत. या नोंदणी झालेल्या शाळांमध्ये मुंबईत दोन हजार ४६३ शाळा असल्या, तरी त्यापैकी केवळ एक हजार ३८१ इतक्याच शाळांची आरटीई प्रवेशासाठीच्या नोंदणीनंतर पडताळणी पूर्ण झाली आहे. शाळा पडताळणी झाल्या त्याची संख्या खूप कमी असून मुंबईपेक्षा इतर जिल्ह्यामध्ये नोंदणी आणि त्यानंतर पडताळणी करणाऱ्या शाळांची संख्या अधिक आहे.

**मुंबई शिक्षण उपसंचालक विभागातील शाळा**

| विभाग | एकूण शाळा | नोंदणी शाळा |
| --- | --- | --- |
| मुंबई- | २,४६३ - | १,३८१ |
| ठाणे- | ३,३८७ - | २,६११ |
| रायगड- | ३,०४४ - | २,८९० |
| पालघर- | २,६७८ - | २,४१० |

# उन्हाळी हंगामातील भातशेती बहरली

**। खांब । वार्ताहर ।**

कालव्याच्या पाण्यावर केली जाणारी उन्हाळी भातशेती बहरल्याने शेतकरीवर्ग समाधानी दिसत आहे. डोलवहाळ बंधाऱ्याच्या माध्यमातून कालव्याच्या सहाय्याने काही भागात उन्हाळी हंगामातील भातशेती पिकविली जाते.

उन्हाळी भातशेतीचे पिक हे शेतकरीवर्गाच्या हातात असल्याने ते त्यांना चांगले परवडते. कालव्याच्या माध्यमातून शेतीला आवश्यक पाणीपुरवठा केला जात असल्याने पाण्याचेही योग्य प्रकारे नियोजन करून आपल्याला आवश्यक असणारी पिके सहजपणे पिकविली जातात. साधारणपणे डिसेंबर महिन्यात कालव्याचे पाणी उपलब्ध झाले तर भातपिके तयार होऊन कापणी लायक होतात. कधी पाणी उशिरा मिळाल्याने पुरेसा हंगाम मिळत नसल्याने मोसमी पावसामुळे भातशेतीचे नुकसान होण्याची शक्यता असते.

# पोलादपूर मच्छीमार्केट बनले वाहनतळ

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

पोलादपूर ग्रामपंचायतीच्या काही इमारती नगरपंचायत झाल्यावर नगरपंचायतीकडे वर्ग झाल्यानंतर त्यांची व्यवस्थित देखभालदुरूस्ती करण्यात न आल्याने मोडतोड होऊन नगरपंचायतीचा महसूल घटू लागला आहे. पोलादपूर-महाबळेश्वर रस्त्यावर मटण, चिकन, मच्छी विक्रेते यांची दुकाने सुरू झाल्याने वाहतुकीची कोंडी वाढू लागली असल्याचे दिसून येत आहे.



पोलादपूर ग्रामपंचायतीच्या काळात एसटी स्थानकासमोर मच्छीविक्रेते बसत असताना त्याला अटकाव करण्यात आला. पोलादपूर महाबळेश्वर रस्त्यावर मच्छी आणि चिकन विक्रेते यांची दुकाने सुरू झाली.

यामुळे पोलादपूर शहरामध्ये जैवकचरा वाहून जाण्याची सुविधा नसतानाही मोठ्या प्रमाणात दुर्गंधी निर्माण करणारा जैव कचरा उचलण्याची सुविधा नगरपंचायतीच्या कचरा गाडीला करावी लागत आहे.

पोलादपूर मटण मार्केटची दुरवस्था झाल्यानंतर तीन कोटींचा निधी उपलब्ध झाला होता. मात्र, त्यावेळी दुरूस्ती करण्यासाठी तरतूद केली नसल्याने मटण मार्केटमधील मटण विक्रेत्या दुकानदारांनी पोलादपूर महाबळेश्वर रस्त्यावर दुकाने थाटून मटण विक्री सुरू करण्यास सुरूवात केली आहे. एकाने या मासळी विक्रीच्या शेडचा वापर वाहनतळासाठी केला आहे.

पोलादपूर नगरपंचायतीने तातडीने मच्छी आणि मटण मार्केटची इमारत पाडून त्याठिकाणी मांसाहारी लोकांसाठी संकुल उभारून एकाच परिसरामध्ये मटण, मच्छी व गावठी तसेच ब्रॉयलर कोंबड्यांचे मांस विक्री करणाऱ्या दुकान गाळयांची व्यवस्था सुरू करण्याची मागणी होत आहे.

# खालापुरात मतदान जनजागृती

**। रसायनी । वार्ताहर ।**

खालापूर तालुक्यात जिल्हाधिकारी रायगड, निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली महसुल विभाग, शाळा, महाविद्यालय, सामाजिक संस्था यांच्या माध्यमातून स्वीप कार्यक्रम अंतर्गत मतदार यांच्यासाठी मतदान जनजागृती कार्यक्रम मोठ्या उत्साहात सुरू आहे.भारत निवडणुक आयोगाने लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे, त्यामुळे ३३ मावळ लोकसभा क्षेत्र आणि १८९ कर्जत खालापूर विधानसभा क्षेत्रात मतदान जनजागृती कार्यक्रम सुरू झाला असून त्याला मतदार यांचाही मोठा सहभाग मिळत आहे.या कार्यक्रमांतर्गत भित्ती पत्रके, शाळा महाविद्यालय यांच्या माध्यमातून प्रभात फेरी,चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, घोष वाक्य, विद्यार्थी आपल्या पालकांचे फॉर्म भरून त्यावर त्यांच्या स्वाक्षरी घेणे असे कार्यक्रम सुरु आहेत. मावळ लोकसभा क्षेत्र सहाय्यक निवडणूक अधिकारी अजित नैराले यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार आयुब तांबोळी हे संपूर्ण खालापूर तालुक्यात स्वीप हा अभिनव कार्यक्रम राबवित आहेत.

# दिव्यांग सर्वेक्षणाला मुहूर्त

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्यातील दिव्यांगांची नेमकी आकडेवारी उपलब्ध नसल्याने अखेर तीस वर्षांनंतर दिव्यांगांचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यभरात या अंतर्गत घरोघरी जाऊन दिव्यांगांची माहिती संकलित केली जाणार असून, सर्वेक्षणासाठी दोन महिन्यांचा कालावधी देण्यात आला असून, आवश्यकतेनुसार त्यात वाढ करण्यात येईल. या सर्वेक्षणातून दिव्यांगांची नेमकी संख्या स्पष्ट होऊ शकणार आहे.

दिव्यांग वक्तींच्या गरजा ओळखणे, त्यांचे सर्वांगीण पुनर्वसन करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी माहिती संकलित केली जाणार आहे. राज्यातील दिव्यांगांची संख्या २०११ च्या जनगणनेनुसार २९ लाख ६३ हजार होती. जुन्या कायद्यामध्ये दिव्यांगांचे सातच प्रकार होते. मात्र नवीन कायद्यानुसार दिव्यांगांचे एकवीस प्रकार निश्चित करण्यात आले आहेत. राज्यातील अकोला, परभणी, सातारा या जिल्ह्यांत सर्वेक्षण पूर्ण झाले आहे, तर बीड, धुळे, ठाणे या जिल्ह्यांमध्ये सर्वेक्षण सुरू आहे. त्यामुळे आता उर्वरित जिल्ह्यांमध्ये सर्वेक्षण केले जाणार आहे.

दिव्यांग व्यक्ती अधिकार कायद्यात दिव्यांग व्यक्ती, विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण, तपासणी व दिव्यांगत्वाचे कारण शोधण्यासाठी संशोधन करण्याची तरतूद आहे. त्या आधारे दिव्यांग व्यक्तींसाठी आरोग्य सुविधा, दिव्यांगत्व प्रतिबंधात्मक उपाय करण्यासाठी उपक्रम, योजना आखण्याबाबत नमूद करण्यात आले आहे.

आशा सेविका, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेवक यांच्यामार्फत सर्वेक्षण जिल्ह्यातील दिव्यांगांच्या सर्वेक्षणासाठी संबंधित जिल्हाधिकारी व महापालिका क्षेत्रात संबंधित आयुक्त नोडल अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत. दिव्यांगांच्या सर्वेक्षणाच्या कामासाठी स्वयंसेवी संस्थेची निवड केली जाणार आहे.

# माथेरानचा ब्रिटिशकालीन शारलोट गाळात

**। माथेरान । वार्ताहर ।**

**शहरातील नागरिकांची तहान भागवणाऱ्या ब्रिटिशकालीन शारलोट तलावाची पातळी खालावली आहे. तलाव गाळाने भरल्याने साठवण क्षमता कमी झाली आहे. त्यामुळे पाणीटंचाईच्या झळा बसण्याची शक्यता असल्याने किमान यंदा तरी पावसाळ्यापूर्वी तलावातील गाळ काढण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.**



माथेरानमध्ये दरवर्षी अतिवृष्टी होते, मात्र प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागते. तलावात पाणी कमी आणि गाळ जास्त अशी स्थिती आहे. सध्या शहरात नेरळ-कुंभे येथून पाणीपुरवठा होत आहे. शारलोट तलावाची देखभाल-दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येत असून शुद्धीकरण करून पाणी शहरात वितरित केले जाते. शहरात येणाऱ्या पर्यटकांसह स्थानिकही हेच पाणी वापरतात. मात्र नऊ वर्षांपासून तलावाची साफसफाई करण्यात आलेली नाही.

पावसाळ्यात तीन दिशांचे पाणी तलावात वाहत येत असून जमिनीची धूप होत असल्याने मोठ्या प्रमाणात गाळ साचला आहे.

२०१५ मध्ये नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने श्रीसदस्यांमार्फत तलावाची साफसफाई करून गाळ काढण्यात आला होता. त्यानंतर नेरळ कुंभे येथून पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला. त्यामुळे शारलोट तलावाच्या देखभाल-दुरुस्तीकडे दुर्लक्ष झाल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

तलावाची खोली ६० फूट असून लांबी ५०० मीटर व रुंदी ८० मीटर आहे. शारलोट तलाव ऑक्टोबरपर्यंत तुडुंब भरलेला असतो. शहरात येणाऱ्या पर्यटकांची संख्या पाहता, तलावातील पाणी फक्त चार महिने पुरते. यासाठी एमजेपी अधिकारी तलावातील पाणी उपसा कमी करीत आहे. सध्या तलावात साठवण क्षमता ४० फुटापर्यंत असून जवळपास २५ फूट गाळ साचल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

### शारलोट तलावाचा इतिहास

माथेरान शारलोट तलावाची निर्मिती ब्रिटिशकाळात झाली. १८५६ मध्ये फुलर नावाच्या अधिकाऱ्याने तीन दिशांहून येणारे पाणी एकत्र करत शारलोट तलावाची उभारणीचे नियोजन केले. बांध टाकून एक छोटा तलाव पूर्ण केला आणि तलावाला आपल्या पत्नीचे नाव शारलोट दिले. त्यानंतर काही वर्षांनी तत्कालीन नगराध्यक्ष गोपाळराव शिंदे यांनी या तलावाची पातळी वाढवली, तेव्हापासून तलावाचे पाणी शहरवासीयांना उपलब्ध होत आहे.

### निधी मिळत नसल्याने काम रखडले

पूर्वी माथेरानमध्ये एमजेपीच्या माध्यमातून गावातील लोकांना रोजगार देऊन आठ ते दहा दिवस शारलोट तलावातील गाळ काढला जायचा. त्यामुळे साठवण क्षमता वाढून स्वच्छ पाणी माथेरानकरांना मिळायचे. १० वर्षांपासून एमजेपीकडून निधी मिळत नाही असे सांगितले जाते. त्यामुळे नगरपालिका आणि एमजेपी यांनी मनुष्यबळ लावून संयुक्तरीत्या काम करावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

गतवर्षी शारलोट तलाव गाळमुक्त करण्यासाठी नगरपालिका आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी एकत्र येत तयारी सुरू केली. पालिकेकडून निधीची तरतूदही करण्यात आली होती, पण तलावातील पाणी सोडण्याबाबत पाणी वाहून जाणाऱ्या मार्गातील गावातील लोकांना माहिती न दिल्याने काम थांबले. याची पुनरावृत्ती पुन्हा होऊ नये, यासाठी कामाचे नियोजन एप्रिलपासूनच करावे, अशी स्थानिकांची मागणी आहे.

> **शारलोट तलाव माथेरानकरांचे तहान भागवतो. पाणी पातळी वाढवण्यासाठी एमजेपीने आतापासूनच नियोजन केले पाहिजे. पाणी साठा वाढल्यास टंचाईची समस्या काही अंशी दूर होईल. या वर्षी जानेवारीपासून काही विभागात मंगळवार तर काही विभागांत बुधवारी पाणी कपात करण्यात येत आहे. गतवर्षी शारलोट तलाव गाळमुक्त झाला असता तर, पाणीकपातीची वेळ आली नसती.**
> **- नितीन विश्वनाथ सावंत,**
> **स्थानिक नागरिक**

# बंधारे उभारणीकडे शासनाचे दुर्लक्ष

## कोल्हापुरी पध्दतीचे बंधारे बांधण्याची मागणी



। माणगाव । सलीम शेख ।

भविष्यातील पाणी टंचाई व भूगर्भातील पाण्याची पातळी वाढावी व माणगावसह अनेक गावांना भेडसावणारा पाणी टंचाईचा प्रश्न कायमचा सुटावा अशी नागरिकांना अपेक्षा आहे. या महत्वाच्या प्रश्नाकडे शासनाने अक्षम्य दुर्लक्ष चालवले आहे. दरवर्षी उद्भवणाऱ्या पाणी टंचाईचा फटका विशेतः दुर्गम भागातील नागरिक जनतेला मोठया प्रमाणात बसत असून नागरिकांना दिवसेंदिवस भीषण पाणी टंचाईला तोंड दयावे लागत आहे. शासनाने पाणी नियोजनाबरोबरच नदया, ओहळ यावर कच्चे व पक्के कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे बांधून पाणी आडविल्यास भविष्यात पाण्याचा प्रश्न कायमचा निकाली निघणार आहे.

कोकणात मोठया प्रमाणात पाऊस पडतो. तेच पाणी वाहून नदीतून समुद्रात जाउन मिळते. मात्र, फारसे जमिनीत मुरत नाही. त्यामुळे येथील विहिरीच्या पाण्याची तसेच नदीच्या पाण्याची पातळी वाढत नाही. त्यामुळे भूर्गभातील पाण्याची पातळी उन्हाळ्यात खाली जाते. यामुळे दरवर्षी अनेक गावांना पीण्याच्या पाणीटंचाईशी सामना करावा लागतो. बॅरिस्टर ए.आर अंतुले यांनी मुख्यमंत्री असताना सन १९८०-८१ मध्ये कोकणातील जलविद्युत प्रकल्पाची पहाणी करून रायगड जिल्हयात काळ व कुंभे, रत्नागिरी जिल्हयात बाव व सप्तलिंगी, तर ठाणे जिल्हयात पाट व दमणगंगा या पाच जलविद्युत प्रकल्पांचा बारकाईने अभ्यास केला होता. त्यातील सध्या कार्यान्वित होत असलेला काळ व कुंभे जलविद्युत प्रकल्प मिळून ३०.०४ दषलक्ष घन मीटर पाणी उपलब्ध होणार आहे. शिवाय ४५ मेगावॅट वीज निर्मीती व २,३७५ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. यामुळे टंचाईग्रस्त गावांचा भविष्यातील पाणी प्रश्न सुटणार आहे. वास्तविक सर्व्हे झालेले प्रकल्प कार्यान्वित झाले असते.

उन्हाळ्यात शेकडो गावांना पिण्यासाठी बैलगाडया, टँकर द्वारे पाणी पुरवठा करून शासन कोटयावधी रूपये खर्च करते. संपूर्ण महाराष्ट्रात ४००० टी.एम.सी पाणी उपलब्ध आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे. त्यापैकी ४५ टक्के म्हणजेच १८६२ टी.एम.सी पाणी एकटया कोकणात आहे. एवढा पाऊस पडूनही कोकणात बहुतांशी जमीन कोरडवाहू व एकपिकी आहे. आज कोकणात व उर्वरीत मराष्ट्रात वीजटंचाई मोठया प्रमाणात आहे. पाण्याअभावी वीज निर्मिती पुरेशी होत नाही. देशाने अमृतमहोत्स नुकताच साजरा केला. तरीही नागरिकांना पाणी टंचाईशी सामना करावा लागत आहे.

# पनवेल पालिकेच्या तिजोरीत ३३३ कोटी रुपये जमा

। पनवेल । प्रतिनिधी ।

मार्चअखेरपर्यंत थकीत कर भरल्यास दंड टाळता येण्यासाठी पनवेल महापालिकेतील शेकडो करदाते मालमत्ता कराचा भरणा करत असून गुरुवारी एकाच दिवशी तीन कोटी रुपयांपेक्षा अधिक कर पालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे. ही आजपर्यंतची सर्वात उच्चांकी वसुली झाल्याची माहिती महापालिका प्रशासनाने दिली. आर्थिक वर्ष मार्च महिन्यात संपत असल्याने करदाते कर भरत आहेत. २०२३-२४ या आर्थिक वर्षात आत्तापर्यंत ३३३ कोटी मालमत्ता कर जमा झाला आहे. पालिकेने करवसुलीसाठी नेमलेल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांमुळे ही वसुली प्रभावीपणे होत आहे.

पनवेल महापालिकेमध्ये साडेतीन लाख करदाते असून सिडको वसाहत क्षेत्र आणि ग्रामीण भागातून पालिकेच्या तिजोरीत १२०० कोटी रुपये थकीत मालमत्ता कर जमा होणे शिल्लक आहे. औद्योगिक वसाहत आणि सिडकोचे रहिवास क्षेत्र यांमधून आतापर्यंत ३३३ कोटी रुपये जमा झाले आहेत.

यामध्ये १२४ कोटी ५७ लाख रुपये खारघर वसाहतीच्या परिसरातून जमा झाल्याची माहिती पालिकेच्या जनसंपर्क विभागाने गुरुवारी ठळकपणे प्रसिद्ध केली. याच खारघर वसाहतीमधील सामाजिक संस्थेने (खारघर फोरम) उच्च न्यायालयात जनहित याचिका केली आहे.

अद्याप या याचिकेचा निर्णय लागला नसल्याने करदाते संभ्रमात आहेत. पालिकेचे तत्कालिन आयुक्त गणेश देशमुख यांनी करदात्यांनी कर भरावा, असे आवाहन केले आहे.

### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसिने सर्वांना कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी मौजे -धोत्रे, ता. कर्जत, जि. रायगड, येथील श्री. पुष्पा सतीश गायकवाड यांची शेतजमीन मिळकत कायम स्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तिचे रेव्हेन्यू रेकॉर्ड प्रमाणे वर्णन खालील प्रमाणे

**मौजे-धोत्रे, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| अ.क्र. | स.न./ग.न. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| १ | ३/१० | ०-८९-० पैकी ०-२०-० | ०-५८ |

वरील तदंगभूत हक्कहितसंबंध सुध्दा

तरी वर नमूद मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बोजा, वहिवाट, पोटगी, गहाण, दान, हक्कसोडपत्र, बक्षीस, फारोक्त वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यांसह लेखी हरकत दाखल करण्यात याव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजा रहित आहे असे समजून आमचे आशील सादर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे आशीलांवर बंधनकारक राहणार नाही.

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. संदिप हरिश्चंद्र मसणे**
मो न.९६०४५४५७७७
कोर्ट व्ह्यू बिल्डिंग पहिला मजला
फ्लॅट नं. १०१, कर्जत दिवाणी कोर्टा समोर, कर्जत, ता. कर्जत जि. रायगड

# नवनगर निर्मितीचा फटका १२४ गावांना

। उरण । वार्ताहर ।

शासनाने अटल सेतू प्रभावित क्षेत्रातील उरण, पेण, पनवेल तालुक्यातील १२४ गावांत नवनगर उभी करण्यासाठी एमएमआरडीएला नवे नगर विकास प्राधिकरण म्हणून नियुक्त केले आहे. यामुळे या गावातील नागरिकांचा विकास होणार की गावे उद्ध्वस्त होणार अशी भीती ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे.

यामध्ये ग्रामस्थांनी शासनाच्या धोरणाबाबत अनेक शंका व्यक्त करण्यास सुरूवात केली. यामध्ये शासनाने यापूर्वी ही गावे नवी मुंबई विमानतळ प्रभावित क्षेत्र म्हणून घोषित करून ती सिडकोकडे विकास प्राधिकरण म्हणून सुपूर्द केली होती. यातील उरण-पनवेलमधील २९ गावे ही खोपटे नवे शहराच्या नावाने घोषित केली होती. ती आता एमएमआरडीएमध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत.

याच परिसरात विरार ते अलिबाग कॉरिडॉर हा महामार्ग प्रस्तावित आहे. तर अटल सेतूला जोडणारा मुंबई-पुणे द्रुतगती मार्गही प्रस्तावित आहे. एकीकडे जेएनपीटी बंदर आणि बंदराला जोडणारे दोन राष्ट्रीय महामार्ग तर अटल सेतू यामुळे संपूर्ण परिसरात रस्त्यांचे जाळे पसरले आहे. मुंबई आणि नवी मुंबईनंतरचे एक नवे नगर वसविण्याचा शासनाचा संकल्प आहे. शासनाने नवे नगर जाहीर करीत उरण, पेण, पनवेलमधील १२४ गावे ही अटल सेतू बाधित गावे जाहीर करत या क्षेत्रात नियोजन करण्यासाठी एमएमआरडीएची नियुक्ती केली आहे. ती शेतकऱ्यांच्या हिताची नसल्याचे मत एमएम आरडीए विरोधी समितीचे निमंत्रक रूपेश पाटील यांनी व्यक्त केले आहे.

सरकार २०१३ च्या भूसंपादन कायद्याला बगल देत जमिनी लाटण्याची नवी खेळी खेळत आहे. या कायद्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीला अधिकाधिक दर, २० टक्के विकसित भूखंड, प्रकल्पबाधित म्हणून रोजगार आधी हक्क देण्याची तरतूद आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी लाभधारक असलेला कायदा सर्व प्रकारच्या भूसंपादनात सरकार नाकारत आहे. त्यामुळेच या धोरणाला शेतकऱ्यांनी कडाडून विरोध केला पाहिजे.

कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांच्या जमिनीचे सरकार आणि भांडवलदार दोघांपासून संरक्षण करावे असे आवाहन खोपटे येथील शेतकरी संजय ठाकूर यांनी केले आहे. एमएम आरडीएने ज्या क्षेत्रात तिसरी मुंबई जाहीर केली तिथे २००३ ते २०२४ या कालावधीत सरकारने अनेक योजना आणल्या. त्यात धरसोडपणा असल्याचे दिसून आले आहे. आपण तेव्हाही या प्रकल्पांना आव्हान दिले.आपण अनेक लढे लढलो आणि जिंकलो असल्याची आठवण करून देताना हाही इथेही लढून जिंकू असा विश्वास उरण, पनवेल आणि पेण तालुक्यातील गावबैठकांत व्यक्त केला जात आहे.

# सापडले प्राचीन खेळ मंकाळाचे पट

। नेरळ । प्रतिनिधी।

कर्जत तालुक्यातील मोठे वेणगाव या गावाच्या उत्तरेला दहिवली गावाच्या वशीवरील शेवटची देवता म्हणून प्रसिद्ध असलेल्या जाखमाता परिसरात प्राचीन खेळ मंकाळाचे तब्बल अठरा कोरीव आढळून आले आहेत. हे पट इतिहास अभ्यासक आणि संशोधक सागर सुर्वे आणि नेत्रा कनोजे यांनी शोधून काढले आहेत. या ऐतिहासिक ठेव्यामुळे कर्जतच्या इतिहासात आणखी भर पडली आहे. दहिवली गावाच्या वेशीचा प्रकल्प करत असताना हे दोघे जाखमाता परिसरात संशोधन करण्यासाठी गेले होते. तिथे त्यांना एका प्रशस्त कातळावर तमाल उमरा कोरीव पट आढळून आला. लाकडी मेटाचेसुद्धा ठिकाण शोधण्यात या दोन अभ्यासकांना यश आले आहे. आतापर्यंतचे सर्वात मोठे आणि एकाच जागी इतक्या मोठ्या प्रमाणावर कोरीव पट पहिल्यांदाच आढळून आले आहे.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांन बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :-**

**परिशिष्ट**

**१) मौजे - सावळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे. आर.- पॉ. | रुपये | पैसे |
| राहत शोहेब दरवेश | ८ | ४ब | ०-५१-०० पैकी ०-२४-५० | ० | ३७ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
सही/ -
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक : ३१/०३ /२०२४
मो.नं. ९०२८९८२२७७
कार्यालयीन पत्ता: फ्लॅट नं. ४, ए विंग, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका कार्यालय शेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१.
ई मेल:-adv.jayeshmhase@gmail.com

# पंढरीनाथ रुठे यांचे निधन



। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील बीड (बुद्रुक) गावातील पंढरीनाथ आंबो रूठे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. निधना समयी ते ६४ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन पुत्र, दोन कन्या, सूना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. पंढरीनाथ रुठे हे अत्यंत मनमिळाऊ स्वभावाचे होते.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक १) जयतीलाल शेषमल परमार २) विनोद जयतीलाल परमार यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे रजपे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| २/१ | ०-२२-०० हे आर पॉ एवढे क्षेत्र | ०-२० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :: ३१/०३/२०२४
मोबा. ९८२२६९११०९
**ॲड. निलेश कान्हु मोरे**
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक १) करण बळवंत घुमरे २) विनिता वळवंत घुमरे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे - हुमगाव, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| १५/४ | ०-११-४० हे आर पॉ एवढे क्षेत्र | १-४४ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ३१/०३/२०२४
मोबा. ९८२२६९११०९
**ॲड. निलेश कान्हु मोरे**
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक १) दर्शना सदाशिव मसणे उर्फ अश्विनी अशोक राणे २) रेणुका सदाशिव मसणे उर्फ भुमिका भरत फोपे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे - हुमगाव, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे. आर.पॉ) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ७०/९/ब | ०-६५-०० हे आर पॉ या जमिन मिळकतीच्या एकुण क्षेत्रापैकी वरील मालक यांचे मालकीचे क्षेत्र ०-३०-०० हे आर पॉ एवढे क्षेत्र | ०-५९ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ३१/०३/२०२४
मोबा. ९८२२६९११०९
**ॲड. निलेश कान्हु मोरे**
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसने असे कळविण्यात येते की, खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत आमचे अशिलांनी ता. ०४/०६/२०१२ रोजी सदर मिळकती कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याबाबत मिळकतीचे मालक (१) किसन पांडूरंग पाटील, (२) सुरेश पांडूरंग पाटील, (३) प्रभाकर पांडूरंग पाटील, (४) शैलजा वसंत पाटील, (५) मनोज वसंत पाटील, (६) महेश वसंत पाटील, (७) मुकेश वसंत पाटील, (८) ज्योत्स्ना मधुकर नवले, सर्व रा. नांदाईचापाडा, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे सोबत साठेकरार केला होता व आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| गावाचे नाव | सर्व्हे/गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र है. आर | आकार रु. पै |
|---|---|---|---|---|
| मौजे- आगरसुरे (नवीन महसूली गाव नांदाईपाडा), ता. अलिबाग, जि.रायगड | गट नं. ७१ (जुना सर्व्हे नं. ४०५ ) | ० | ०.३४.०० पो.ख ०.०३.०० एकुण ०.३७.०० | ८.०० |
| मौजे सुरेखार, ता.अलिबाग, जि. रायगड | गट नं. ५७ | ० | १.१४.३० पो.ख.०.०५.८० एकुण १.२०.१० | १५.५० |

सदर मिळकतीबाबत अलिबाग येथील सिव्हील जज्ज व स्तर सो. यांच्या कोर्टात आमचे अशिलाने दावा क्र. १४८/२०२२ हा दावा दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये मे. कोर्टाने प्र.वादी (मिळकतीचे मालक) यांचे विरुध्द " issue show cause notice to defendant No.1 to 9 as why ad-interim injunction in favour of the plaintiff should not be granted as prayed, R / o 18/11/2022" अशी order ता. १०/१०/२०२२ केलेली आहे व ती आजतागायत चालू आहे. तसेच आमचे अशिलाने सदर मिळकतीबाबत ता. २३/०१/२०२३ रोजी Notice of lis Pendence (नोटीस ऑफ लिज पेंडेन्स) अशी नोटीस सब रजिस्टार अलिबाग यांचे कार्यालयात नोंदणीकृत केलेली आहे. सदर दस्त ३४१/२०२३ या नंबरकडे नोंदणीकृत केलेला आहे.

सदर दाव्यातील प्र. वादी यांनी अद्याप दाव्यास व नि.नं.५ चे अर्जास कैफियत व म्हणणे दिलेले नाही. प्रवादी यांचे म्हणणे व कैफियत आजतागायत कोर्टाच्या रेकॉर्डवर आलेले नाही. म्हणजे मे कोर्टाने दिलेली " issue show cause notice to defendant No.1 to 9" ही अद्याप अस्तित्वात आहे. अलिकडेच आमचे अशिलास अशी खात्रीलायक माहिती समजली आहे की, सदर मिळकतीमध्ये अन्य त्रयस्थ इसमांचे हक्क प्र.वादी दाखल करणार आहेत मे.सब रजिस्टार, अलिबाग यांचे कार्यालयात खरेदीखत रजिस्टर करण्याचा प्रवादी यांचा इरादा आहे. तेव्हा सदर मिळकतीबाबत आमचे अशिलाचे हक्क असताना अन्य त्रयस्थ इसमांनी अगर कंपन्यांनी, अगर एजंटनी सदर मिळकतीबाबत कोणतेही खरेदीखत, अन्य हस्तांतरणाचे दस्त करु नये.

याउपरही तसा कोणताही दस्त केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक नसेल व सदर दस्त करणाऱ्यांवर आमचे अशिल दिवाणी व फौजदारी कारवाई करतील याची नोंद घ्यावी.

अलिबाग
ता. ३०/०३/२०२४
सही/-
अशिला तर्फे वकिल
**ॲड. जी. जी. गोंधळी**
रा. गोंधळी निवास, अंकुर ड्रायफ्रुट समोर, बाजारपेठ, ता. अलिबाग, जि. रायगड

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालक १. श्री. शांताराम लक्ष्मण देवघरे, २. श्री. सुरेश लक्ष्मण देवघरे, दोघेही रा. मु. पो. कडाव ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे कडाव, तालुका कर्जत, जिल्हा रायगड**

| सर्वे नं. हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|
| २०/१ | ०-८०-२० पैकी विक्री केलेले क्षेत्र ४० गुंठे | ५=५७ |

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. ३१/३/२०२४

**ॲड. कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस, एलएल.बी
प्रभात अपार्टमेंट, रूम नं. ४,
दुसरा मजला, सुनिल चिक्कीजवळ,
ता.कर्जत, जि.रायगड
मो. नं. ९९६०८३८१६४ /९०२८५०८४९६

**URGENT VACANCY**
**TAM HERO**
Authorised Dealer For Hero Mic & Scooter
Workshop

| Name of Post | No. of post | Experience |
|---|---|---|
| Sr.Technician | 3 | Min. 4Yrs Exp. |
| Technician | 2 | Min. 3 Yrs Exp. |
| Helper | 2 | Fresher's |
| Spare Parts Manager | 1 | Min. 5 To 6 Year's |
| Workshop Manager | 1 | Min. 5 To 6 Year's |
| Floor Supervisor | 2 | Min. 3 To 4 Year's |
| Workshop Billing | 1 | |

**Sales**
Sales Executive
Male/Female
Basic Computer Knowladge Req.
Vadkhal branch Incharge
Walking Interview On - 03/April/2024
Or Send Resume
Email Id : gmsales.tammotors@gmail.com
Time : 11 am to 5 pm
Mob. : 9324706789

### जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीव्दारे कळविण्यात येते की,

ज्या अर्थी मौजे शिरवली, ता. महाड, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाची शेत जमिन मिळकत सदर मिळकतीचे कब्जेदार / मालक १. श्री. रमेश हरी कासारे, २. श्री. गणेश हरी कासारे, ३. श्री. दिलीप हरी कासारे, ४. सौ. सुनिता सखाराम सकपाळ यांचेकडून आमचे अशिल १. श्री. धर्मेश रामदास मढवी व सौ. प्राजक्ता धर्मेश मढवी, राहणार- रत्नदिप निवास, मु. भिंगारी, तालुका पनवेल, जि.रायगड यांनी ही जमिन कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे शिरवली, ता. महाड, जि. रायगड**

| अ. क्र. | भू.क्र. | हि. नं. | क्षेत्र हे. आर.पॉ. | पोट खराबा हे. आर. पॉ | एकूण | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २९२ | - | ०-३५-०० पैकी ०-१८-०० | ०-००-०० | ०-३५-०० पैकी ०-१८-०० | ०.३७ |

त्या अर्थी सदर वर वर्णन केलेल्या एकूण ०-३५-०० पैकी ०-१८-०० हे. आर. पॉ. मध्ये अगर तिचे कोणतेही भागावर तिन्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, कुळ वहीवाट, करारनामा, एम.ओ.यू., हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्कक-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानीशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहीत मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर शेत जमीन मिळकतीवरील सदरील १. श्री. रमेश हरी कासारे, २. श्री. गणेश हरी कासारे, ३. श्री. दिलीप हरी कासारे, ४. सौ. सुनिता सखाराम सकपाळ यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील वरील मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत व आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्व जाहीर व्हावे.

ठिकाण-पनवेल
दि. २७/०३/२०२४
सही/-
**सागर सुरेश गोंधळी**
ॲडव्होकेट
आफीस पत्ता : मु./पो.नावडे,
ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

**क्लासिफाईड**
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- इंग्लीश बोलण्यांतील अडथळे, भिती खात्रीने घालवणार सोपा कोर्स. नंबर जपून ठेवा, गरज लागेल. ९८२२८४२८१०
- शुभमुहूर्त विवाह मंडळ अलिबाग शाखेत सर्वजातीय वधूवरांची नावनोंदणी ४८ शाखा, वेबसाईट नोंदणीसाठी -९२२६७६६१२९
- चेंढरे अलिबाग येथे बंगला with Terrace भाड्याने देणे आहे. बंगला १००० चौरस फूट. मागे २००० चौरस फूट लॉन, नारळाची झाडे. इच्छुक भाडेकरूंनी संपर्क साधावा ९८६७२१४६१६
- मांडवा जेट्टी येथील घर व घराच्या आजूबाजूचा परिसर साफ सफाई करण्यासाठी पुरुष/मुलगा पाहिजे.मासिक पगार रुपये ८०००/- ते १००००/- वयाची अट नाही. संपर्क : ८६९८६८२१२१

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

# अनोखी मतदान जनजागृती

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**
**आगामी लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने मतदार जनजागृती मोहीम प्रांताधिकारी डॉ. महेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण श्रीवर्धन विधानसभा मतदार संघात सुरु आहे.मतदानाचे महत्व घरोघरी पोहोचावे, या उद्देशाने माध्यमातून गॅस सिलिंडरवर मतदान जनजागृतीसाठी स्टिकर लावण्यात आला.**



प्रांताधिकारी डॉ. महेश पाटील यांनी म्हसळा येथील कादिरी एच.पी. गॅस एजन्सी येथे भेट देऊन ग्राहकांना प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर देवघर येथे जाऊन ग्रामस्थांना याबाबत मार्गदर्शन केले.

प्रांताधिकारी डॉ. महेश पाटील यांनी सांगितले कि, प्रत्येक मतदाराने मतदान करणे हे त्याचे कर्तव्य असून आगामी लोकसभा निवडणुकीत कोणत्याही अमिषाला बळी न पडता निर्भयपणे मतदान करा. त्याचप्रमाणे आगामी काळात लोकसभा निवडणुकीसाठी खूप कमी म्हणजे ५०टक्केच्या आसपास मतदान होते. ही टक्केवारी ७५ ते ८० टक्क्यांपर्यंत पोहचावी म्हणून ग्रामस्थांनी प्रशासनाला जास्तीत जास्त सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

याप्रसंगी तहसीलदार समीर घारे, विठ्ठल राठोड, धर्मराज पाटील, गणेश तेलंगे, केमनाईक, सईद अहमद जहीर कादिरी, सलीम शहा, श्रीधर महामुनकर, अनिल महामूनकर, बापू महामूनकर, गोरख माने, विलास कदम, अमित महामूनकर, सलीम दोंदीलकर, उदय महामूनकर आदी उपस्थित होते.



# आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**
हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त म्हसळा ग्रामीण रूग्णालयात वैद्यकिय अधिक्षक डॉ.महेश मेहता यांच्या हस्ते महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. म्हसळा ग्रामीण रूग्णालयात मागील चार महिने अपुरा कर्मचारी असताना सेवेत कार्यरत असणाऱ्या मोजक्याच अधिकारी व कर्मचारी वर्गाने सर्वच प्रकारच्या रुग्णांना वेळेत आणि चांगली आरोग्य सेवा सुविधा दिली होती.

त्यांच्या या कार्याबद्दल वैद्यकीय अधिकारी डॉ.महेश मेहता यांनी डॉ. मोहमद रहाटविलकर, सिध्दकला काते, नलिनी जाधव, प्रदिप काळोखे, रुपेश कांबळे, दिव्या गीजे, दिपेश्री जंगम, रेखा म्हात्रे, कमलेश बेटकर यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देत सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सन्मान केला.

सोनम सुगदरे, अश्विनी जाधव, आकाश म्हात्रे, श्रीकांत कदम, अश्विनी मेहत्रे, नौसीन परकार यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी अस्मिता तांबडे, डॉ. फराह जलाल, डॉ. भावना अर्बन, सायली केलसकर, सागर सानप, वैशाली पाटील, युक्ता तुरे, सागर गाणेकार, विश्वजीत सालावकर, साहिल उबाळे, कमलेश बेटकर आदी मान्यवर अधिकारी व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

# बिराडी कुटुंबियांना मारझोड करणारे मोकाट

**। लांजा । प्रतिनिधी ।**
तालुक्यातील गोळवशी खांबड वाडी येथील दिवेश यशवंत बिराडी (२२) यांच्या घरातील कुटुंबीयांना मंगळवारी (दि.५) दुपारी साडेबाराच्या सुमारास आरोपी कल्पेश रांबाडे, प्रशांत रांबाडे आणि त्यांच्या चार साथीदार (रा.कोंड्ये) यांनी गोळवशी येथे बेदम मारहाण केली. दिवेश यशवंत बिराडी यांच्यामुळे संबंधित कुटुबियांशी सोयरीक जमवण्यात अडसर येत असल्याच्या भावनेतून बिराडी कुटुंबियांवर हल्ला केल्याची माहिती मिळत आहे.

मारहाण झाल्याबद्दल लांजा पोलीस ठाण्यात दिवेश यशवंत बिराडी यांनी तक्रार दाखल केली आहे. परंतु, पोलिसांनी बिराडी यांच्या तक्रारीची गांभीर्याने दखल घेतली नाही म्हणून दुसऱ्या दिवशी पुन्हा लेखी गुन्हा दाखल करण्यास पोलीसांना भाग पाडले. मात्र, मार्च महिना संपत आला तरी लांजा पोलिसांकडून गुन्हेगारांवर कारवाई का झाली नाही, असा प्रश्न संतप्त नागरिक विचारत आहेत. असे प्रकार कोकणात सुरु झाले तर कोकणचा युपी, बिहार व्हायला वेळ लागणार नाही, अशा संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. तसेच, आरोपींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी बिराडी कुटुंबिय करीत आहेत.

# नागोठण्यात बकऱ्यांची चोरी

**। नागोठणे । वार्ताहर ।**
नागोठणे येथील आझाद मोहल्ला भागातून तीन बकऱ्या व एक बोकड अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली. याबाबत बकरी मालक जोहेब दादामिया कुरेशी (३५) नागोठणे यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी (दि.२३) दुपारी साडेतीन वाजताच्या सुमारास नागोठणे येथील आझाद मोहल्लात अज्ञात चोरट्याने कुरेशी यांच्या सोजत जातीची एक बकरी व एक बोकड, तसेच इंदोरी जातीची व शिरोही जातीची एक-एक बकरी अशा एकूण ३५ हजार रुपये किमतींच्या बकऱ्या चोरून नेल्या आहेत.

याबाबत नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वडगाव शाळेस डायटच्या प्राचार्यांची भेट

**। रसायनी । वार्ताहर ।**
रसायनी पाताळगंगा परिसरातील वडगाव शाळेच्या विद्यार्थी गुणवत्ता व शिक्षकांच्या कार्याचे डायट संस्थेच्या प्राचार्यांनी पाहणी करून त्यांचे कौतुक केले. रायगड जिल्हा परिषद ग्रामीण उत्कृष्ट आदर्श शाळेला आज जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थाचे प्राचार्य डॉ.सुभाष महाजन व केंद्रप्रमुख जे.पी.परदेशी यांनी सदिच्छा भेट दिली. महाजन यांनी शाळेच्या भौतिक सुविधा, मैदान, आवार भिंतीवरील चित्रकला, शैक्षणिक लेखन, पाणी फिल्टर, महावाचन चळवळीसाठी सुरू असलेले वाचन चटई व मुस्कान किताब घर, कम्पोस्ट प्लॅन्टर, भाज्यांची लागवड, वर्ग खोल्यांची रचना, हवेशीर व पुरेशा प्रकाशाची असून व्हर्टिकल पद्धतीने सुद्धा मुले अध्ययन करू शकतात. मुलांचे वाचन, डिजिटल साहित्य हाताळणी व स्वयंअध्ययन इत्यादी बाबींची पाहणी करत शिक्षकांच्या कामाचे व मुख्याध्यापक सुभाष राठोड यांचे कौतुक केले.



## लाडकुबाई मोहिते यांचे निधन



**। उरण । वार्ताहर ।**
उरण तालुक्यातील दादर पाडा येथील राहणाऱ्या लाडकुबाई बाळू मोहिते यांचे वृद्धपकाळाने वयाच्या ९३ वर्षी शनिवारी (दि.२३) निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली, नातू, पणतू असा मोठा परिवार आहे.

लाडकुबाई बाळू मोहिते यांचे दशक्रिया विधी सोमवार दि.१ एप्रिल रोजी सकाळी साडेआठ वाजता भोम खाडी येथे होणार असून तेरावे गुरुवार दि.४ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता राहत्या घरी दादरपाडा येथे होणार आहे.

# गुळसुंदे शाळेतील पाण्याची समस्या सुटली

**। रसायनी । वार्ताहर ।**
स्वामी विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूल गुळसुंदे येथील मुख्याध्यापिका ममता पाटील यांच्या पाठपुराव्याने व अजित पाटील यांच्या सहकार्याने प्रमोद झवेरी फाऊंडेशनकडून बोअरवेलच्या माध्यमातून शाळेतील मुलांना पिण्याच्या पाण्याची समस्या सुटली आहे. फाल्गुनी देवांग झवेरी यांच्या सहकार्याने जवळपास चारशे मुलांना याचा लाभ झाला आहे.



या कार्यक्रमासाठी कैलास गावडे, आर.डी.पाटील, सखाराम पाटील, भाई लाड, बबनराव गुडेकर, जिग्नेश दवे, आनंद उपासनी, सचिन पवार, राजेश बावीसकर, सुनील पाटील, प्रताप पंडित आदि मान्यवर उपस्थित होते.

# डंपरमधून पडणाऱ्या खडीने अपघाताची शक्यता

**। कोर्लई । वार्ताहर ।**
साळाव-मुरुड रस्त्यावर काशीद येथे जेट्टीचे काम सुरू असून त्यासाठी तालुक्यातील मजगांव परीसरातून डंपर वाहतूकीची रेलचेल सुरू आहे. डंपर वाहतुकीत दांडा गावातील रस्त्यावर गतीरोधकजवळ डंपरमधून पडत असलेल्या खडीमुळे वेळप्रसंगी अपघाताची भीती व्यक्त केली जात आहे.



शासनाच्या संबंधित विभागाने यात लक्ष पुरवून संबंधित डंपर चालकांना सूचना देण्यात येऊन योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी जोर धरत आहे.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. ३१ मार्च ते ०६ एप्रिल २०२४

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

## यशप्राप्ती होईल

**मेष :** मेषराशीधारकांनी आपले ग्रहमान पाहता ह्या नवीन वर्षात दूरवर किंवा परदेशात जाऊन शिक्षण घेण्याची आपली इच्छा फलद्रुप होऊ शकेल. नंतर आपणास गूढ विषयांची गोडी लागेल. आपल्या माणसाकडून होणाऱ्या प्राप्तीत सप्ताहाच्या मध्यापासून कपात होण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांचा अभ्यास चांगला होईल. आपणास अभ्यासाची गोडी कमी असून सुद्धा किंवा काही अनिश्चितता आली तरी आपण प्रगती साधू शकाल. असे असले तरी पुढील आठवड्यापासून ते अखेरपर्यंत अधिक परिश्रम करावे लागतील. मित्र वर्तुळात अधिक वेळ वाया दवडू नये अन्यथा त्यांच्यामुळे आपल्या अभ्यासावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. उच्च शिक्षणासाठी परदेशात जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना शेवटच्या दिवसांत यशप्राप्ती होईल. परदेशी जाण्यात काही अडचणी येत असल्यास त्या दूर होतील. आध्यात्मिक साधना व व्यायामातील नियमितता आपल्यासाठी योग्य ठरेल. **महिलांना**-आपली माहेरची माणसे घरी येतील त्यांची ऊठबस करावी लागेल, कामात असताना तब्येतीकडे दुर्लक्ष करू नका, नको त्या विचारात अडकू नका. तब्येत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा. **शुभदिनांक**- ०२,०३

## नाराजीचे सूर उमटतील

**वृषभ :** वृषभराशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता नवीन वर्षात होणारे काही खर्च वगळल्यास बहुतांश वेळी पैसे शिल्लक पडू शकतील. वर्षाच्या सुरवातीस प्राप्तीत वाढ होण्यासाठी केलेले प्रयत्न आता फलद्रुप होतील. घरगुती संबंधात गोडवा राहील. मात्र जिवलग मित्रांचा सहवास घडण्याची शक्यता धूसरच राहील. कदाचित मित्रांचे सहकार्य न लाभल्याने त्यांच्याप्रती आपल्या मनात नाराजीचे सूर उमटतील, मात्र तसे करण्यात त्यांचा काही दोष नसून परिस्थितीच तशी असेल हे ध्यानात ठेवावे. नंतर ह्या स्थितीत सुधारणा होण्याची शक्यता आहे. सप्ताहाच्या अखेरपर्यंत प्रियव्यक्ती संबंधित काही चिंता निर्माण झाली तरी उर्वरित काळ अनुकूल असल्याने प्रियव्यक्ती किंवा वैवाहिक जोडीदाराशी आपण जवळीक साधू शकाल. विद्यार्थी उत्तम प्रगती करू शकणार असले तरी त्यांना वाईट संगत सोडण्याचा सल्ला देण्यात येत आहे. **महिलांना**- प्रणयी जीवनात व दांपत्य जीवनात चांगल्या सानिध्याची जाणीव होईल. एकंदरीत ह्या वर्षी आपले आरोग्य चांगले राहिले तरी प्रवासात, साहस करण्या योग्य स्थळी प्रवास करताना दुखापत होण्याची शक्यता असल्याने काळजी घ्यावी लागेल. **शुभदिनांक**- ३१,०२

## कामात यशस्वी व्हाल

**मिथुन :** मिथुनराशीसाठी आपले ग्रहमान पाहता ह्या नविन वर्षात आपले कष्ट बहरून येतील. कारकीर्द, अभ्यास, आर्थिक उन्नती, संबंध, सामाजिक अशा कोणत्याही क्षेत्रात आजवर प्रगती साधण्यासाठी किंवा स्वतःची नवीन ओळख बनविण्यासाठी जे काही प्रयत्न आपण केले असतील त्याचे फळ आता मिळू शकेल. सुरवातीच्या दिवसात प्रवासात त्रास होण्याची शक्यता असल्याने शक्यतो तो टाळण्याचा प्रयत्न करावा. मध्यानंतर स्थितीत सुधारणा होऊ लागेल. संपूर्ण वर्षभरात प्रवासाच्या आयोजनात शेवटच्या क्षणापर्यंत अनिश्चितता राहण्याची शक्यता अधिक आहे. सप्ताहाच्या सुरवातीस पैतृक संपत्ती संबंधित कामात यशस्वी होऊ शकाल. ह्या व्यतिरिक्त वडीलांकडून काही लाभ होण्याची अपेक्षा बाळगू शकाल. आर्थिक आघाडीवर काळजी करण्यासारखे काही नाही. बहुदा प्राप्तीत वाढ होण्यासाठी आपण योग्य नियोजन करून भरघोस फायदा मिळवू शकाल. **महिलांना**- पुढील कालावधीत आपल्या प्राप्तीतील अनिश्चितता वाढेल. अखेरीस पैश्यांच्या अभावी आपला खोळंबा होऊ नये म्हणून आगाऊ नियोजन करणे गरजेचे ठरेल. **शुभदिनांक**- ०१,०३

## कौटुंबिक कार्यात विलंब

**कर्क :** कर्कराशीधारकास या सप्ताहात पाहता हे नवीन वर्ष आपल्यासाठी खूपच आशास्पद आहे. आर्थिक प्रगतीची शक्यता असली तरी कौटुंबिक संबंधांची काळजी घ्यावी लागेल. कोणत्याही बाबतीत कुटुंबियांशी चर्चा करताना आपल्या शब्दात स्पष्टता असण्याची गरज आहे. ह्या व्यतिरिक्त प्रत्येकवेळी आपलेच म्हणणे खरे असल्याचा हट्ट धरू नये. मागील काही दिवसांपासून कौटुंबिक कार्यात विलंब होत असल्यास नंतर त्यास गती प्राप्त होईल. ह्या दरम्यान प्रेम संबंध टिकविण्यासाठी सुद्धा आपणास अधिक प्रयत्न करावे लागतील. विशेषतः या सप्ताहात मध्यापासून संबंध संथ गतीने वाटचाल करत असल्याचे आपणास जाणवेल. विवाहितांना मात्र काहीसे बरे वाटेल. ज्यांना नवीन प्रेमसंबंधांची सुरवात करावयाची आहे त्यांना प्रेमाचा प्रस्ताव मांडण्यात काही अडचणी येऊ शकतात. कार्यस्थळी स्पर्धेस सामोरे जाण्याची तयारी ठेवावी लागेल. **महिलांना**- कुटुंबियांशी चर्चेतून किंवा वागणुकीतून गैरसमज उद्भवणार नाहीत ह्याची काळजी घ्यावी लागेल. आर्थिक आघाडीवर विशेष त्रास होणार नसला तरी वर्षभर कुटुंबियांसाठी केलेल्या खर्चात आपणास फायदा मिळण्याची आशा आपण बाळगू नये. **शुभ दिनांक**- ०४,०५.

## प्रकृतीस्वास्थ्य जपा

**सिंह :** सिंहराशीसाठी हा सप्ताहात पाहता नवीन वर्षात आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. त्यासाठी हा आठवड्यांचा पूर्वार्ध अनुकूल आहे. ह्या व्यतिरिक्त संपूर्ण आठवड्याचे दिवस सुद्धा अनुकूल आहेत. तरीही वागणुकीच्या बाबतीत शक्यतो आपली प्रतिष्ठा मलीन होणार नाही अशी वागणूक ठेवा किंवा एखाद्या कायदेशीर कार्यवाहीस आपणास सामोरे जावे लागणार नाही ह्याची काळजी घ्यावी. नवीन विचारसरणीने आपण कामात मार्गक्रमण कराल. सुरवातीस विद्यार्थ्यांना अधिक मेहनतीसाठी तयार राहावे लागेल. मागील काही दिवसांपासून आपला अभ्यास संथ गतीने होत असेल जो नंतरपासून योग्य गती साधू शकेल. असे असले तरी आपला मार्ग सोपा नसेल. मेहनत हवी त्यात कमी पडू नका. नंतर आपल्या स्थितीत सुधारणा होऊ लागेल. **महिलांना**- प्रकृतीस्वास्थ्य जपा. अखेरीस आरोग्य विषयक काही त्रास होण्याची शक्यता आहे, जुने विकार बळावण्याची शक्यता अधिक आहे. कामाच्या ताणामुळे अनेकदा आपणास थकवा येऊ शकतो. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. **शुभदिनांक**- ३१,०१

## कटुता निर्माण होण्याची शक्यता

**कन्या :** कन्याराशीसाठी सुरवातीला हे नवीन वर्ष आपल्यासाठी उत्साह घेऊन आले आहे. मागील काही दिवसांपासून आपसात संबंधातील नीरसता व अनिश्चिततेचा सामना आपण करत असलात तर आता काळजी करणे सोडा, कारण जानेवारी अखेर पासून बहुतांश बाबतीत आपण सुनिश्चित होऊ शकाल. ह्या आठवड्यात आपल्या कामातून आपण बऱ्याच नवीन गोष्टी शिकू शकाल. जीवनशैली उंचावण्यासाठी सुद्धा खर्च होण्याची शक्यता आहे. व्यावहारिक संबंधातील अनिश्चिततेमुळे वर्तमान संबंध तोडून नवे संबंध जोडण्यावर आपण अधिक भर द्याल. मात्र ह्या बाबतीत निर्णय घेताना व्यावहारिक दृष्टिकोन ठेवावा अन्यथा आपल्यावर पश्चाताप करण्याची पाळी येईल. जोडीदाराची निवड करताना सुद्धा घाई करू नये अन्यथा वैचारिक मतभेदामुळे संबंधात कटुता निर्माण होण्याची शक्यता आहे. विवाहाविषयी कोणताही निर्णय घेण्यास नंतरच अनुकूलता लाभेल. **महिलांना**- अखेरच्या तीन दिवसांत कौटुंबिक संबंधात काळजी घ्यावी लागेल. व्यावसायिक कारणांसाठी मालमत्ता खरेदी करू शकाल. जर आपण व्यवसाय वृद्धीसाठी मालमत्ता, मशिनरी इत्यादी खरेदी करण्याचा विचार करत असाल **शुभदिनांक**- ०५,०६

## बोलण्यावर नियंत्रण ठेवावे

**तुळ :** तुलराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता नवीन वर्षात आपल्या संततीला प्रथित यश मिळेल विद्यार्थ्यांसाठी हे वर्ष बरेच यश देणारे असेल आणि स्पर्धा परीक्षेत ही यश मिळाल्याने तुमचे मनोबल वाढलेले असेल. खर्चाचे प्रमाण वाढणार आहे, तेव्हा प्रथमपासून अनावश्यक खर्च टाळण्याचा प्रयत्न करा. काही समस्या आल्यास आपल्या बुद्धिचातुर्याचा उपयोग करून त्या सोडविण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू ठीक राहील. हितशत्रूंचा ससेमिरा जाणवणार नाही. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. व्यवहारात सावधानता बाळगा. लांबचे प्रवास टाळा. आपण सर्वांशी सामंजस्याने वागणे हितकारक राहील. जवळच्या आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. या सप्ताहात आपणास कलाक्षेत्राच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळू शकेल. मात्र अहंकारापासून दूर राहा. **महिलांना**- अनावश्यक गोष्टींची चर्चा करण्यापेक्षा स्वतःच्या कामात अधिक लक्ष दिल्यास ते हितकारक ठरू शकेल. वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावेत. बोलण्यावर मात्र नियंत्रण ठेवावे म्हणजे गैरसमज होणार नाहीत. आपण आर्थिक व्यवहारात सावधगिरी बाळगल्यास हा आठवडा सर्व दृष्टीने चांगला जाऊ शकेल. **शुभदिनांक**- ०१,०३

## प्रलोभनांना भुलू नका

**वृश्चिक :** वृश्चिकराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता नवीन वर्षात सर्वांशी प्रेमाने वागल्यास आपल्याला मदतीचा हात येऊ शकेल. सरकारी नियम व कायदा यांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्या. आपल्या मुलांसाठी हा काळ बराच अनुकूल राहील यश मिळेल, उत्तरार्धात सार्वजनिक जीवनात आपली सक्रियता वाढेल. ह्या व्यतिरिक्त प्रणयी जीवनाचा नवीन अध्याय सुरु करू शकाल. नियमित व्यायाम व योगाचा अवलंब करावा. दम लागेपर्यंत काम करू नका. ज्येष्ठांचा आदर राखा. नको त्या प्रलोभनांना भुलू नका, सरळ मार्ग अवलंबा. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. धार्मिक गोष्टींना प्राधान्य द्याल. मिळणारे समाधान हीच खऱ्या आनंदाची खूण आहे. याबाबतीतला विचार करून वागण्याचा प्रयत्न केल्यास हा आठवडा खऱ्या अर्थाने उत्तम घालवू शकाल. **महिलांना**- कौटुंबिक व कार्यालयीन कामे चातुर्याने पुरी करण्याचा प्रयत्न करा. कामाचा उत्साह वाढेल मात्र कटू बोलण्याचे प्रसंग कटाक्षाने टाळा. आपण आपली अस्मिता शुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. **शुभदिनांक**- ०२,०४

## सावधानता बाळगा

**धनु :** धनुराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता नवीन वर्षात धन आवक सातत्याने वाढत राहील ज्यामुळे तुम्ही बरेच प्रसन्न राहाल. प्रकृतीची काळजी घ्या, आपण आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवून वागल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य होईल. आपल्या बोलण्याने इतरांचा 'इगो' दुखावणार नाही याची दक्षता घ्या. भविष्याचा विचार न करता वर्तमानकाळाचा आनंद घेऊन सुखी-समाधानी राहण्याचा प्रयत्न करा. जागरण टाळा सरकारी नियम व कायद्याचे पालन कटाक्षाने पाळा. चुकीच्या पैशाचा मोह करू नका सरकारी देणी त्वरित भरा. भक्तिमार्गाचा अवलंब केल्यास आनंद मिळू शकेल. आपण सामंजस ठेवल्यास ही वेळ आपल्यासाठी संधी देणारी असेल, आपल्या ओळखीचा फायदा कसा करायचा हे ठरवा बाकी सर्व सोपे होईल, **महिलांना**- आपण मेहनतीच्या पर्वातून प्रवास करीत आहात हे विसरू नका व प्रत्येक बाबतीत सावधानता बाळगल्यास हा आठवडा चांगला जाऊ शकेल. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा, जेणेकरून आपल्याबद्दल गैरसमज व नाराजी होणार नाही. आपली कुवत पाहूनच जबाबदारी स्वीकारा. **शुभदिनांक**- ०१, ०५

## प्रवास योग संभवतात

**मकर :** मकरराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता वर्षाची सुरवात करिअरसाठी सामान्य रूपात शुभ राहील. तुम्ही कुठल्या मोठ्या व्यावसायिकांसोबत राहून काम ही करू शकाल. या राशीतील विद्यार्थ्यांना यावर्षी काही मोठी संधी प्राप्त होऊ शकते. तुमच्यासाठी हे वर्ष बरेच उत्तम सिद्ध होईल कारण तुमचे अधिक प्रयत्न यश अर्जित करतील. आर्थिक दृष्टिकोनातून ही वर्ष बरेच अनुकूल आहे आणि ह्या आठवड्यात आयात-निर्यातीशी संबंधित व्यापाऱ्यांना लाभ व यश प्राप्ती होईल. नवीन कामाची सुरवात काळजीपूर्वक करावी. अधीरता व आक्रमक वृत्ती किंवा अंधानुकरण आपल्या मनास सतत नकारात्मकतेकडे खेचून घेईल. मानसिक स्थिती अस्थिर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रार्थना आपल्याला साथ देऊ शकेल विचारपूर्वक केलेली कृती फायदा देणारी असेल. कामानिमित्त प्रवास योग संभवतात. कोणालाही राग येणार नाही अशा दृष्टीने वागणे हितकारक राहील. **महिलांना**- उपवास करताना फळ आहार घेणे आपल्याला फायद्याचे आहे. किमती वस्तूची खरेदी करू शकाल घरात महत्वाची वस्तु येईल. कौटुंबिक वातावरण वादासारख्या प्रसंगांनी बिघडणार नाही याची दक्षता घ्या. **शुभदिनांक**- ०४,०६

## विद्यार्थ्यांना उत्तम यश

**कुंभ :** कुंभराशी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता नवीन वर्षात तुम्ही वाहन खरेदी करू शकाल. दुसरीकडे वर्षाची सुरवात काहीशी चांगली राहील आणि लग्न झालेल्या कुटुंबात नवीन सदस्याचे आगमन होऊ शकते. शिक्षणात तसेच काही क्रिएटिव्ह क्षेत्रात आपल वर्चस्व निर्माण होईल. कौटुंबिक जीवनात नजर टाकली असता कुटुंबातील लोक अध्यात्मिक गोष्टीत अधिक लक्ष देतील. तथापि इतर काही लोकांसोबत विरोधाभासाची स्थिती बनलेली राहील. धन संबंधित वाद कुटुंबातील शांती भंग करू शकतो. विद्यार्थ्यांसाठी नवीन वर्ष सामान्य राहील प्रोफेशनल कोर्सची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मात्र उत्तम यश मिळेल. ते उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात बरेच चांगले प्रदर्शन करण्यात यशस्वी राहतील. वित्तीय निर्णय घेण्याआधी बरेच विचार करावे लागतील. वर्षाची सुरवात करिअरसाठी काहीशी आव्हानात्मक राहू शकते, सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. **महिलांना**- महिलांना घरबसल्या धनलाभ देणारा कालावधी आहे, हा काळ उत्तम असून कोणत्याही क्षेत्रात यश मिळेल, मोसमी आजारांपासून सावध राहा. **शुभ दिनांक**- ३१,०३

## कामांना गती मिळेल

**मीन :**मीनराशीसाठी या सप्ताहात नवीन वर्षांचे ग्रहमान पाहता शांत राहून परिस्थितीचा आढावा घ्यावा. आप्तेष्टांशी संपर्कात राहा व कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. कुटुंबातील ताळमेळ एकमेकांच्या मदतीने पुढे जाईल जर तुम्हाला कुटुंब जोडून ठेवायचे असेल तर, तुम्हाला काही ठिकाणी समझोता करावा लागेल. तुमचे आर्थिक जीवन बदलण्याची शक्यता असेल, विद्यार्थ्यांसाठी आता अनुकूल दिवसांची सुरवात झाली आहे. विद्यार्थ्यांना चांगल्या गुणांची प्राप्ती होईल. अभ्यासात त्यांचे लक्ष लागून अभ्यास चांगला होऊ शकेल, राजकारणापासून दूर राहणे चांगले. कोर्टाच्या कामांना गती मिळेल. करिअरच्या दृष्टिकोनातून तुम्हाला पद प्राप्ती होऊ शकते. आपल्या मुलांसाठी हा काळ बराच अनुकूल राहील यश मिळेल, उत्तरार्धात सार्वजनिक जीवनात आपली सक्रियता वाढेल **महिलांना** - मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. तरीही ग्रहमान पाहता आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. तुमच्या परिवाराला सामाजिक रूपात सन्मान आणि संपन्नता प्राप्त होईल. **शुभ दिनांक**- ३१, ०५



# आवाज, वक्तृत्व आणि व्यक्तिमत्त्व...

कोकणस्पंदन
**धनंजय शेट्ये**

आवाज आणि व्यक्तिमत्त्व हे आपल्या उत्कर्षासाठी महत्त्वपूर्ण असते. आपल्या मधाळ बोलण्याने श्रोत्यांची मने जिंकता आली पाहिजेत. रेडिओ जॉकी आमिन सायानीचा मी जणू भक्त होतो. सिलोन रडियो....सिबाका गीतमाला माझा अतिशय आवडता कार्यक्रम होता. आमिन भाई ...फक्त 'बहनो भाईयो...' एवढं बोलले की सर्व काही बाजूला ठेवून कानाचे डोळे करुन रेडिओमध्ये मन गुंतवून राहायचं.अहाहा..! काय पण ती शब्दफेक असायची... बोलण्यातला गोडवा... शब्दांचं उच्चारण. मन वेधून घ्यायचं. 'विविध भारती' हे आकाशवाणीचे आवडते केंद्र... अर्थात, आजही तेच माझं आवडतं आकाशवाणी केंद्र आहे. त्या सर्वच निवेदकांनी आवड निर्माण होण्याइतपत नेहमीच सादरीकरण केले आहे. आजही टीव्ही चॅनेलच्या साम्राज्यात आवर्जून मी 'विविधभारती'वर प्रसारित होणारी गाणीच आवडीने ऐकतो. का कुणास ठाऊक, मन ते निवेदकांचं बोलणं आजही तोच बाज, ढंग मोहीत करते. कृष्ण बुटाणी, श्रीराम केळकर उत्तम निवेदक त्यांच्या आवाजात श्रोत्यांची मन जिंकण्याची एक अजब ताकद होती.

राजकीय नेत्यांच्या प्रभावशाली वक्तृत्वाने तर मन आनंदून जायचे. हिंदुहृदयसम्राट सन्माननीय स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या भाषणात जो करारीपणा, बेधडकपणा, हजरजबाबीपणा आणि रोखठोकपणा तसेच विनोदी भाषाशैली असायची. ते ऐकण्यासाठी कित्येकदा मी शिवाजी पार्कच्या त्या मैदानात दसरा मेळाव्यात विचारांचं सोनं मनात साठवून घेतलं होतं. मुंबईत आल्यानंतर बाळासाहेबांच्या जहाल भाषणासाठी प्रत्येक दसरा मेळाव्यात मी शिवाजी पार्क मैदानात हजेरी लावायचो. बाळासाहेबांच्या प्रेरक विचारांनी बेभान व्हायचो.

विलासराव देशमुख यांचं भाषण अगदी अलगदपणे झाडावरून आवाज न करता पडणाऱ्या पारिजातकाच्या सुगंधीत फुलासारखं असायचं. व्यासंगी विचार, देखणं व्यक्तिमत्त्व अनोखी एखाद्या अभिनेत्यासारखी आकर्षक केशरचना आणि मिश्किल विनोद त्यामुळे यांचे भाषण मन आकर्षून घ्यायचे. विरोधकांवर मार्मिक टीका करायचे, पण अगदी सौम्य साहित्यिक शब्दात.

सन्माननीय ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांचे भाषण ऐकताना त्यांच्या अनुभवजन्य ज्ञानाचा परिचय त्यांच्या भाषणातून व्यक्त व्हायचं. त्यांच्या आयुष्यातले प्रत्येक अनुभव ऐकताना आपली उत्कंठा वाढवायचे. ते अगदी कालपरवाच्या पुण्यातील राज ठाकरे यांनी घेतलेल्या महामुलाखतीच्या प्रसंगी सुशीलकुमार शिंदे यांच्या सन्माननीय शरद पवार यांच्या बाबतीतला एक किस्सा सांगून प्रेक्षकवर्गात प्रचंड हशा पिकवला होता.

स्वाभिमानी बुलंद नेता कोकणचा वाघ म्हणजे नारायणराव राणे साहेब... अर्थात, त्यांची अगदी सुरुवातीच्या काळातली त्यांची भाषणे आणि आजची त्यांची भाषणे यामध्ये बराच फरक जाणवतो. आज त्यांची कोणतीही मुलाखत असो वा भाषण, त्यामध्ये त्यांची सडेतोड उत्तरासोबत परिस्थितीचा सखोल अभ्यास आणि अनुभवजन्य ज्ञान हे महान प्रेरक ठरतो. प्रचंड आशावाद आणि स्वाभिमानी स्वभाव यामुळेच त्यांच्या भाषणात धडाडी बेधडकपणा जाणवतो. एक दरारा एक थरार त्यांच्या जहाल वक्तव्यातून जाणवतो. महाराष्ट्राच्या राजकारणाचा सखोल अभ्यास हा त्यांच्या प्रत्येक अनुभवातून स्वाध्याय सोडवल्यागत सहज होतो. परिस्थितीचा योग्य होमवर्क करुन नंतरच त्याचं विचारपूर्वक बोलणं असतं. त्यामुळे अशा धडाडीच्या नेत्यांकडून बरंच काही शिकायला मिळाले.

अजितदादा पवार यांच भाषणातील बोलणं तरुण मनाचा ठाव घेतं. शिवरायांच्या मावळ्यांचा जोश आणि विरोधकांच्या चुकीच्या गोष्टीवर सडेतोड टीका. प्रसंगी एक जिव्हाळासुद्धा त्यांच्या भाषणातून जाणवतो. अर्थात, कधी कधी बोलण्याच्या ओघात अनौपचारिक गोष्टी नकळत बोलल्या जातात. पेचप्रसंग निर्माण होतात. ग्रामीण लेहजा त्यांच्या मधाळ बोलीचा एक विशेष आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांना हा नेता आपला जवळचा नेता वाटतो. टीकेला तशाच शेलक्या शब्दात सडेतोड उत्तर देण्याचं कौशल्य हे अजितदादांच्या वक्तृत्वाचा महान पैले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्षप्रमुख सन्माननीय शरदरावजी पवार याचं भाषण म्हणजे अतिशय संयमित अर्थपूर्ण नैतिकता सांभाळून व्यासंगी ज्ञानाचा खजिना राजकीय डावपेचाच्या गुप्त खेळाचे नियम हळुवार उघडत प्रतिपक्षाला गोंधळात टाकणारी एक शाब्दिक खेळी म्हणता येईल. कधी कधी असा प्रश्न पडतो की, या व्यक्तीकडे सर्वच विषयाचं सर्वच ज्ञान उपलब्ध कसं? राजकारणाचा प्रचंड अभ्यास आणि दीर्घकालीन अनुभव यामुळेच त्यांची सर्वच भाषणे प्रभावशाली ठरतात. राजकारण आणि राजकीय डावपेच यांचं एकमेव 'राजकारणाच विद्यापीठ' म्हणजे शरदचंद्ररावजी पवारसाहेब म्हटलं तर वावगं ठरणारं नाही.राज ठाकरे यांच भाषण ऐकताना... आचार्य अत्रे, प्रबोधनकार ठाकरे, बाळासाहेब ठाकरे अशा सर्वांचा एक विलक्षण प्रभाव आणि छाप अनुभवता येते. भाषण म्हणजे सळसळता झंझावात असतो. प्रचंड गर्दी आणि 'हशा आणि टाळ्या' हे तर प्रत्येक वाक्यागणिक असतातच. तसेच मिमिक्रीच्या माध्यमातून टिका करण्याचं उत्तम कौशल्य राज ठाकरे यांना जमते. समाज परिवर्तनासाठी प्रेरणादायी भाषाशैली.. विनोदी शैलीने शेलकी टीका या सर्वांचा परिणाम म्हणून सकारात्मक बदल जाणवतात.

अर्थात, महाराष्ट्रातल्या अशा महान नेत्यांकडून बरंच काही शिकण्यासारखे आहे. प्रत्येक पक्षातील नेत्यांकडे असलेल्या चांगल्या गोष्टी शिकून घ्याव्यात. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राचं नैतिक महात्म्य हे राजकीय क्षेत्र व सामाजिक क्षेत्र यातून अनुभवता येते. मला सर्व पक्ष समान आहेत. मी सर्वच पक्षाच्या नेत्यांकडून बरचं काही शिकून घेतले आहे. **

**सरकारने जंगले समृद्ध करण्यासाठी, प्रदूषण आणि भेसळीला आळा घालण्यासाठी आणखी कठोर कायदे केले पाहिजेत आणि त्या नियमांचे पूर्णपणे पालन करणे ही आपल्या सर्वांची नैतिक जबाबदारी आहे.**

मोहोर

# प्रदूषणाचा आयुष्यावर परिणाम

**डॉ. प्रितम भि. गेडाम**





मानवी जीवनातील मूलभूत आवश्यक घटकांशी खेळून इतर सुखसोयी मिळवणे हे आता उद्दिष्ट झाले आहे. मग या आधुनिक विकासाला माणसाचा सर्वांगीण विकास कशाच्या आधारावर म्हणायचे? शुद्ध ऑक्सिजन, स्वच्छ पाणी आणि सकस आहार हे मानवाच्या निरोगी आयुष्यासाठी सर्वात महत्त्वाचे आहे, ज्याशिवाय जीवनाची कल्पनाही निरर्थक आहे. आज जगातील किती टक्के लोकांना हे जीवनावश्यक घटक शुद्ध स्वरूपात व योग्य प्रमाणात मिळत आहेत? मोठमोठ्या शहरात तर श्रीमंत असो की गरीब, कमी-जास्त प्रमाणात प्रत्येकाला गुदमरणाऱ्या प्रदूषित वातावरणात जगावे लागत आहे, हे आपल्या सर्वांना ठाऊक आहे. आपल्या ताटातील अन्न किती शुद्ध आहे, हे आजच्या काळात कोणीही सांगू शकत नाही, आणि यामुळेच गरोदर मातांच्या पोटात वाढणाऱ्या बाळांपासून ते सर्व वयोगटातील लोकांपर्यंत घातक आजारांमध्ये मोठी वाढ झाली आहे. हृदयविकाराचा झटका, ब्रेन स्ट्रोक, कॅन्सर यांसारखे आजार तर झपाट्याने वाढत आहेत. आज आपण ज्या वातावरणात जगतोय, त्यामुळे निश्चितच भविष्यात आणखी नवनवीन रोगांचे साम्राज्य वाढणार आहे. या परिस्थितीला फक्त माणूसच जबाबदार आहे. विकासाच्या नावाखाली निसर्गाशी खेळणे, नियम-कायद्याची अवहेलना, भ्रष्टाचार स्वार्थीपणा यामुळे सर्वसामान्यांचे जीवन कमालीचे दुबळे झाले आहे.

वृक्ष हे सजीवांसाठी सर्वात मोठे जीवनदाता आहेत. झाडांशिवाय निसर्गाचे अस्तित्व नाही आणि निसर्गाशिवाय मानवांचे अस्तित्व नाही. झाडांमुळेच आपल्याला शुद्ध ऑक्सिजन, स्वच्छ पाणी आणि पोषक अन्न मिळते. निसर्ग माणसाची प्रत्येक गरज पूर्ण करू शकते, परंतु त्याचे लोभ नाही. दरवर्षी २१ मार्च रोजी वनांच्या महत्त्वाबाबत जनजागृती करण्यासाठी जगभरात 'आंतरराष्ट्रीय वन दिन' साजरा केला जातो. यावर्षी २०२४ ची थीम 'फॉरेस्ट आणि इनोव्हेशन' आहे. आपली जंगले कमी होत आहेत, वर्ल्ड वाइल्डलाइफ फंडच्या अलीकडील अहवालानुसार, २०२२ मध्ये ६.६ दशलक्ष हेक्टर जंगले नष्ट झाली आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे आणि शहरीकरणामुळे जास्त जमिनीची मागणी सतत वाढत आहे, ज्यामुळे गरजा पूर्ण करण्यासाठी अधिक वनक्षेत्रांचा नाश आणि नैसर्गिक संसाधनांचा अतिवापर होतो. पृथ्वीचे तापमान वाढल्याने जंगलांचाही ऱ्हास होत आहे. डाऊन टू अर्थनुसार, भारतातील जंगलतोड वर्ष १९९० ते २००० दरम्यान ३,८४,००० हेक्टरवरून वर्ष २०१५ ते २०२० दरम्यान ६,६८,४०० हेक्टरपर्यंत वाढली आहे. जेव्हा जंगले नाहीशी होतात, तेव्हा त्याचा थेट परिणाम पर्यावरणाच्या प्रत्येक घटकावर होतो आणि वन्यजीवांबरोबर मानवी जीवनावरदेखील अतिशय विपरित परिणाम होतो.

जागतिक रोगांच्या ओझ्यांपैकी १२ टक्के पर्यावरणीय जोखमीचा वाटा आहे, ज्यामध्ये वायू प्रदूषण प्रथम स्थानावर आहे. बीएमजेच्या मते, बारीक कण आणि ओझोन वायुप्रदूषणामुळे दरवर्षी ८३.४ लाख लोक आपला जीव गमावतात. प्रदूषण आणि आरोग्यावरील लॅन्सेट आयोगाने २०१५ मध्ये ९ दशलक्ष अकाली मृत्यूंना प्रदूषण जबाबदार असल्याचा अहवाल दिला, याचा अर्थ जगभरात सहापैकी एक मृत्यू प्रदूषणामुळे होते आणि एकूण ४.६ ट्रिलियन अमेरिकी डॉलर (जागतिक आर्थिक उत्पादनाच्या ६.२%) चे आर्थिक नुकसान होते, १४ लाख अकाली मृत्यूला जलप्रदूषण कारणीभूत होते, शिसे आणि इतर रसायने जागतिक स्तरावर दरवर्षी १८ लाख मृत्यूसाठी जबाबदार होते. ८.७ लाख मृत्यूंना विषारी व्यावसायिक धोके कारणीभूत आहेत. माती प्रदूषणाच्या मानवी संपर्कामुळे दरवर्षी जागतिक स्तरावर ५ लाखांहून अधिक अकाली मृत्यू झाल्याचा अंदाज आहे. विकसनशील देशांमध्ये दर वर्षी चार ते दहा लाख लोक खराब व्यवस्थापित कचऱ्याशी संबंधित रोग आणि अपघातांमुळे मरतात. ९०% पेक्षा जास्त प्रदूषणामुळे होणारे मृत्यू हे कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये होतात. जीबीडी २०१९च्या संशोधनानुसार, वायू प्रदूषण, शिसे प्रदूषण आणि व्यावसायिक प्रदूषणामुळे पुरुषांचा मृत्यू होण्याची शक्यता जास्त आहे, तर जलप्रदूषणामुळे महिला आणि लहान मुलांचा मृत्यू होण्याची शक्यता अधिक आहे. ओझोन आणि पार्टिक्युलेट मॅटर यांसारख्या वायु प्रदूषकांमुळे फुफ्फुस, हृदयरोग आणि इतर आरोग्य समस्यांची तीव्रता वाढते. बीएमजेमध्ये प्रकाशित केलेल्या अभ्यासात असे दिसून आले आहे की उद्योग, वीज निर्मिती आणि वाहतुकीमध्ये जीवाश्म इंधनाच्या वापरामुळे होणारे वायू प्रदूषण जगभरात दरवर्षी ५१ लाख टाळता येण्याजोगे मृत्यूसाठी जबाबदार आहे.

देशात भेसळीची स्थिती अशी आहे की, एक रुपयाच्या फायद्यासाठी स्वार्थी लोक हानिकारक खाद्यपदार्थ स्लो पॉयझनच्या रूपात ग्राहकांना खाऊ घालतात. आता तर बनावट औषधांचे, नशेचेदेखील अब्जावधींचे मार्केट आहे. खाद्यतेल, मसाले, दूध, मिठाई, फराळ, धान्य अशा प्रत्येक वस्तूतील शुद्धतेचे दावे खोटे ठरत आहेत. प्रत्येक तिसरा व्यक्ती भेसळयुक्त दुधाचे सेवन करत असल्याचे संशोधन सांगतो, खाद्यपदार्थांमध्ये भेसळयुक्त विष मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. देशातील बदलत्या खाण्याच्या सवयींचे आधीच विपरीत परिणाम झाले आहेत. आरोग्यदायी सकस अन्नाऐवजी तेलकट, मसालेदार, खारट, गोड आणि पचायला जड पदार्थांची मागणी सातत्याने वाढत आहे. शेतातल्या पिकापासून ते ताटात येईपर्यंत अन्नाला मोठ्या प्रमाणात अनेक हानिकारक रासायनिक प्रक्रियेतून जावे लागते. शेतात रासायनिक खतांची फवारणी, धान्य पॉलिश करणे, चमकदार कृत्रिम रंगांचा वापर, फळे पिकवण्यासाठी हानिकारक रसायनांचा वापर, कॅन केलेला खाद्यपदार्थ आणि पेये यांच्यातील रासायनिक प्रक्रिया यामुळे अन्न विषारी होते. याशिवाय बाहेरील खाद्यपदार्थांमध्ये अस्वच्छतेचा प्रश्नही गंभीर आहे.

मर्लॅन्सेटफ मॅगझिन २०१९ मध्ये जगभरातील आहार-संबंधित मृत्युदरावर प्रकाशित केलेल्या अभ्यासात खराब आहारामुळे होणाऱ्या १५,७३,५९५ मृत्यूंच्या बाबतीत चीननंतर भारत दुसऱ्या क्रमांकावर असल्याचे आढळून आले. तरुण स्वस्त आणि अस्वास्थ्यकर अन्न पर्यायांचा अवलंब करत आहेत ज्यात प्रामुख्याने स्नॅक्सचा समावेश आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, जगातील अंदाजे ६०० दशलक्ष लोक, सुमारे १० पैकी १ दूषित अन्नामुळे आजारी पडतात, परिणामी ३.३ कोटी निरोगी आयुष्याची वर्षे गमावली जातात. कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये असुरक्षित अन्नामुळे उत्पादकता आणि वैद्यकीय खर्चात होणारे नुकसान दरवर्षी ८.६५ लाख कोटी रुपयांचे होते. ५ वर्षांखालील मुलांना अन्नजन्य रोगांचा ४०% भार सहन करावा लागतो, ज्यामुळे दरवर्षी १,२५,००० मृत्यू होतात. हानिकारक जिवाणू, विषाणू, परजीवी किंवा रसायने असलेल्या असुरक्षित अन्नामुळे अतिसारापासून कर्करोगापर्यंत २०० हून अधिक आजार होतात. हे रोग आणि कुपोषणाचे दुष्टचक्रदेखील तयार करते, विशेषत: लहान मुले, वृद्ध आणि आजारी लोकांना प्रभावित करते. अन्नजन्य रोगांच्या आर्थिक भारावर जागतिक बँकेच्या २०१९ च्या अहवालात सूचित केले आहे की कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये अन्नजन्य रोगाशी संबंधित एकूण उत्पादकता नुकसान अंदाजे ७८,८९,७९,५२,००,००० रुपये प्रति वर्ष होते, आणि अन्नाद्वारे होणाऱ्या रोगांच्या उपचारांवर वार्षिक खर्च अंदाजे १२,४२,९१,०५,००,००० रुपये होता.

एक गोष्ट निश्चित आहे, मूलभूत गरजांची जागा इतर सुख-सोयी कधीही घेऊ शकत नाहीत. प्रत्येकजण आपल्या आजूबाजूला सरकारी नियमांची पायमल्ली होताना पाहतो; पण विरोध करण्याची हिंमत करत नाही. शुद्ध प्राणवायू, स्वच्छ पाणी, सकस अन्न या प्रत्येक मानव, प्राणी, पक्षी आणि वन्यजीव यांच्या गरजा आहेत. झाडांनी जंगले आहेत, जंगले समृद्ध तर वन्यजीवांचे अधिवास संरक्षित आहेत, पाण्याचे स्त्रोत समृद्ध आहेत, ऋतुचक्र संतुलित राहते. शेतात पिके फुलतात, निसर्गात अन्नसाखळी सुरळीत चालते. ओझोनचा थर संरक्षित राहतो, मानवाची प्रतिकारशक्ती वाढते आणि रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो. प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यास मदत होते, माणसांपासून ते सर्व प्रकारच्या पशु-पक्ष्यांना शुद्ध हवा, पाणी आणि अन्न मिळते. नैसर्गिक आपत्ती कमी होऊन जीव आणि मालमत्तेची हानी वाचते. वन्यजीव आणि मानव यांच्यातील वाढता संघर्ष थांबतो. सरकारने जंगले समृद्ध करण्यासाठी, प्रदूषण आणि भेसळीला आळा घालण्यासाठी आणखी कठोर कायदे केले पाहिजेत आणि त्या नियमांचे पूर्णपणे पालन करणे ही आपल्या सर्वांची नैतिक जबाबदारी आहे. **

# काळा पैसा, हवाला बाजार आणि मनी लॉन्ड्रिंग

**आविष्कार देसाई**



देशभरात सध्या वाढलेल्या इडीच्या कारवाईमुळे मनी लॉन्ड्रिंग हा शब्द सर्वसामान्य जनतेच्या परवलीचा झाला आहे. मात्र, मनी लॉन्ड्रिंग म्हणजे नेमके काय आहे, हे कदाचीत कमी लोकांना माहिती असेल. मनी लॉन्ड्रिंग समजून घेण्यासाठी आधी आपल्याला ब्लॅकमनी म्हणजेच काळा पैसा समजून घ्यावा लागणार आहे.

देशाचा कारभार सुरु राहण्यासाठी जनता, संस्था, कंपन्यांकडून सरकार कर घेते. हा कर भरला नाही, तर तो पैसा काळा पैसा म्हणून गणला जातो. भारतातील करप्रणालीनुसार पाच लाख रुपयांपर्यंत कोणताही कर घेतला जात नाही. पाच लाखांच्यावर एखाद्याचे उत्पन्न असेल, तर त्याला कर द्यावा लागतो.

साधारणपणे जीएसटी १८ टक्के, बँकेचे २ टक्के, आणि ३० टक्के आयकर असे एकूण ५० टक्के व्यावसायिकाला भरावे लागतात. म्हणजे, जेवढी कमाई होते त्यातील ५० टक्के रक्कम सरकारला कर रुपाने द्यावे लागतात. याच जमा झालेल्या कराच्या पैशातून सरकारमार्फत विविध योजना, प्रकल्प उभारले जातात.

एखादी व्यक्ती १० कोटी कमावत असेल, तर पाच कोटी कर द्यावा लागतो. त्यामुळे आपल्या कमाईतून एवढी मोठी रक्कम देणे काहींना आवडत नाही. ते सदरचा पैसा आपल्याकडेच ठेवतात. त्याला आपण काळा पैसा असे म्हणतो. तो काळा पैसा वाचवण्यासाठी विविध प्रकार आहेत. त्यामध्ये मनी लॉन्ड्रिंग आणि हवाला बाजार हे प्रमुख प्रकार आहेत.

हवाला बाजार काय आहे, हे आता आपण समजून घेऊया. हवाला म्हणजे अनियमित पैशाची हेराफेरी होय. एखादा व्यक्ती सौदीमध्ये काम करते आणि त्याने भारतामध्ये पैसे पाठवेल. ते भारतातील बँकेत येतील. त्यावर कर लागणार असेल, तर त्यातून कराची रक्कम वजा होणार असेल तर ती होते. १० लाख रुपयांच्यावर असणाऱ्या व्यवहारांवर बँकेची नजर असते. यासाठी ओळखपत्राची (केवायसी) आवश्यकता असेत. मात्र, ओळख लपवायची असेल आणि कर चुकवायचा असेल, तर हवाला बाजाराचा आधार घेतला जातो.

**दुबई आणि भारतातील हवाला बाजारातील व्यक्ती आपापासातील व्यवहार पूर्ण करतात. कोण-कोणाला पैसे पाठवत आहे. याची माहिती सरकारला मिळत नाही. यामध्ये कर चुकवेगिरी होते. मनी लॉन्ड्रिंग म्हणजे शब्दशः अर्थ धुणे असा होता. जो काळा पैसा आहे, त्या पैशाला पांढरा करण्यासाठी जी प्रक्रिया अवलंबली जाते, तिला मनी लॉन्ड्रिंग म्हणतात.**

सौदीमधील एखाद्या व्यक्तीला भारतात पैसे पाठवायचे आहेत. मात्र, त्याला कर आणि ओळख लपवाची आहे. यासाठी ते हवाला एजंटकडे जातील आणि त्याला सांगितले की, माझे पाच कोटी रुपये आहेत ते भारतातील अमूकअमूक व्यक्तीला द्यायचे आहेत. हवाला एजंट या व्यवहारामध्ये अगदी नाममात्र रक्कम फी म्हणून आकारतात जी कर रचनेच्या अगदी शुल्लक असते.

हवालावाला संबंधित माणसाकडून पाच कोटी रुपये घेतो आणि त्या व्यक्तीला एक कोडवर्ड सांगतो. हाच कोडवर्ड भारतात रक्कम स्वीकारणाऱ्या व्यक्तीला माहिती असणे गरजेचे आहे. अन्यथा हा व्यवहार होत नाही. कारण, हवालाचा व्यवहार हा पूर्ण विश्वासावर केला जातो. दुबईमधील हवाला बाजारातील व्यक्तीचा अन्य एक व्यक्ती हा भारतात असतो. त्याच्यामार्फत पाच कोटी रुपये मिळणार असतात. या व्यवहारामध्ये दुबईत हवालातील व्यक्तीकडे दिलेले पाच कोटी तिथेच असतात, मात्र भारतातील हवाला बाजारातील व्यक्ती सदरची पाच कोटीची रक्कम दुबईतील माणसाने सांगितलेल्या आणि कोडवर्ड जुळलेल्या व्यक्तीकडेच दिले जातात. त्यानंतर दुबई आणि भारतातील हवाला बाजारातील व्यक्ती आपापासातील व्यवहार पूर्ण करतात. कोण-कोणाला पैसे पाठवत आहे. याची माहिती सरकारला मिळत नाही. यामध्ये कर चुकवेगिरी होते.

आता दुबईत असणारे पैस भारतातील हवाला बाजारातील व्यक्तीला मिळणे गरजेचे आहे. यासाठीच मनी लॉन्ड्रिंगचा आधार घेतला जातो. मनी लॉन्ड्रिंग म्हणजे शब्दशः अर्थ धुणे असा होता. जो काळा पैसा आहे, त्या पैशाला पांढरा करण्यासाठी जी प्रक्रिया अवलंबली जाते, तिला मनी लॉन्ड्रिंग म्हणतात.

दुबईमधील असलेले पाच कोटी भारतात पाठवायचे आहेत. यासाठी भारतामध्ये काही खोट्या/बोगस (शेल) कंपन्या उघडण्यात येतात. प्रत्यक्षात या शेल कंपन्यामध्ये कसलेच, उत्पादन अथवा अन्य कोणतेही कामकाज केले जात नाही. त्या नाममात्र कंपन्या असतात. या शेल कंपन्यांमध्ये काही ठरावीक देशातून गुंतवणूक केली जाते. हवाला बाजारात बल्कमध्ये रक्कम जमा झाली की ते, शेल कंपन्यांमध्ये मोठ्या रकमेची गुंतवणूक करतात. थेट परदेशी गुंतवणुकीला (एफडीआय) कर लागत नाही. नंतर सदरच्या शेल कंपन्या तोट्यात गेल्याचे भासवले जाते.

भारत सरकारने सौदी सरकारकडे याची माहिती मागितली की, सौदी सरकारने भारतातील कोणत्या शेल कंपन्यांमध्ये गुंतवणूक केली आहे हे सांगितले, तर सर्व भ्रष्टाचार बाहेर येऊ शकतो. मात्र, असे काही देश आहेत की, ते याबाबतची माहिती भारताला देण्यास नियमानुसार बांधील नसतात. ज्या देशांकडे उत्पन्नाचे अन्य कोणते साधन नाही, अशा देशांनी शेल कंपन्यांना खतपाणी घालण्यासाठी टॅक्स हेवन निर्माण केले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने मॉरीशस, केमन आयलॅण्ड, स्वित्झर्लॅंडसह अन्य काही मोजक्याच देशांचा समावेश आहे. हे देश अशा आर्थिक व्यवहारांची कोणतीही माहिती देत नाहीत. ते संबंधित व्यक्तीलाच देण्यास बांधील असतात.

भारतातून हे पैसे स्वित्झर्लॅंड या देशात चोरीच्या मार्गाने बोटीतून पाठवले जातात किंवा नेपाळच्या बँकेत एखाद्याच्या खात्यात पाठवले जातात. नंतर ते पैस काढले जातात आणि अन्य व्यक्तीच्या खात्यातून इराणच्या बँकेत भरले जातात. तेथून कोणी अन्य पैसे काढतो आणि अन्य खात्यातून स्वित्झर्लॅंडच्या बँकेतील खात्यात भरले जातात. पैसे काढले की लिंक तुटते. त्याचा शोध घेणे कठीण असते.

स्वित्झर्लॅंड सरकारचा संविधानीक नियम आहे की, याबाबतीत माहिती कोणालाही सांगणार नाही. त्यानंतर या देशातून भारतातील शेल कंपन्यांमध्ये एफडीआय अंतर्गत कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक केली जाते. कालांतराने या शेल कंपन्या तोट्यात गेल्या आणि डुबल्याचे सांगितले जाते. अशा पद्धतीने काळा पैसा पांढरा केला जातो.

**

# कासव संवर्धन

वेळास कासव महोत्सव २०२४ ला ९ मार्चपासून सुरुवात झाली आहे. कासव या प्राण्याबद्दल अनेक कथा प्रसिद्ध आहेत. अनेक जण कासव घरी पाळतात. घरच्या मंडळी आयुष्य वाढतात, तर कासव योग्य दिशेने ठेवले तर पैसा येतो, अशी काहींची समजूत आहे. भारत देशातील अनेक कासव जाती नष्ट होत असताना, कोकणामधील एक गाव वेळास कासव वाचवण्याकरिता पुढे आले. वेळास गावच्या कासव महोत्सवास खरी सुरुवात २००६ ला झाली. २००२ ला भाऊ काटधरे यांनी कासव संवर्धनाकरिता ग्रामस्थांना भेटून त्यांच्यामध्ये जनजागृती निर्माण केली. त्यानंतर वनविभाग ग्रामपंचायत आणि होमस्टे यांच्या सहाय्याने गोपीनाथ गणपत महाडिक आणि समीर गोपीनाथ महाडिक पितापुत्रांनी कासवाचे संवर्धन कार्याला मोलाचे सहकार्य केले. कासव नेहमी आपली अंडी समुद्राबाहेर सोडतात. त्याची संर्वधन जबाबदारी काम जोखमीचे असते. देवेंद्र पाटील, रमेश पाटील सकाळी कडाक्याच्या थंडीमध्ये ही अंडी संवर्धनकरिता आणतात. वेळास कासव महोत्सवाबद्दल प्रतिम कुलपकर यांनी विविध गोष्टीची माहिती दिली.

नारळी-पोफळीच्या गर्द बागा, गुलाबी थंडी, फेसाळणारा समुद्र आणि त्याच किनाऱ्यावर समुद्राच्या दिशेने पळणारी इवली इवली ऑलिव्ह रिडले कासवं..! हे नयनरम्य दृश्य आणि स्वर्गीय अनुभव घेण्यासाठी जगभरातून निसर्गप्रेमी जिथे येतात, ते ठिकाण म्हणजे वेळास येथील कासवं महोत्सव. प्रभू परशुरामांची भूमी म्हणजे कोकण आणि याच कोकणाला पडलेलं सुंदर स्वप्न म्हणजे वेळास गाव. मंडणगड सोडलं की गाडी समुद्राच्या दिशेने चालू लागते. कुठे पक्के रस्ते, तर कुठे लाल धुरळा उडवत सह्याद्रीच्या कुशीतून, गर्द वनातून, नारळी-पोफळीच्या बनातून, बाणकोट नदीच्या सान्निध्यातून, हिम्मतगड (बाणकोट) किल्ल्याला गिरकी घालत गाडी समुद्रकिनाऱ्याच्या बाजूने चालू लागते. समोर नजरेस पडतो तो अथांग फेसाळणारा समुद्र, पांढऱ्या शुभ्र लाटा. किनाऱ्यावर कुठे खडक, तर कुठे वाळू असा मनमोहक नजारा दिसतो आणि दुसऱ्या बाजूस दिसते ते दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेलं हरिहरेश्वर. जगाच्या पाठीवर दुर्मिळ असणारी ऑलिव्ह रिडले कासवे इथेच विपुल प्रमाणात आहेत. दरवर्षी इथे कासव महोत्सव साजरा केला जातो, ज्यासाठी जगभरातून पर्यटक आणि अभ्यासक हजेरी लावतात.

जगभरातील निसर्गप्रेमी आणि पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्रबिंदू असलेला वेळास येथील कासवं महोत्सव ९ मार्च २०२४पासून सुरु झाला असून, पुढे दीड ते दोन महिने कासव महोत्सव साजरा करण्यात येईल. रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यात वेळास हे गाव ऑलिव्ह रिडले या कासवांच्या दुर्मिळ प्रजातीच्या संरक्षणासाठी विशेष प्रसिद्ध आहे. ऑलिव्ह रिडले या कासवांच्या दुर्मिळ प्रजातींचं जतन, संवर्धन आणि संरक्षण तितक्याच मायेनं इथला कोकणी माणूस करतो आणि मग कासवं महोत्सवाच्या निमित्ताने त्या इवल्या जीवांना सुखरूप समुद्रात सोडतो. दरवर्षी साजरा केला जाणारा कासवं महोत्सव हा पर्यटक, निसर्गप्रेमी, अभ्यासक यांच्यासाठी पर्वणीच असते. कासवं महोत्सवाच्या निमित्ताने सह्याद्रीच्या कुशीत आणि कोकणाच्या सान्निध्यात राहण्याच्या अपूर्व अनुभव पर्यटक घेतात.

हे सारं अनुभवायचं असेल तर एकदा कासवं महोत्सवाला आवर्जून भेट द्यायलाच हवी. ९ मार्च २०२४ रोजी कासवं महोत्सव सुरु होतोय आणि आपल्या सेवेसाठी आम्ही सज्ज आहोत... सहकुटुंब, सहपरिवार, मित्रमंडळींसह अवघे अवघे या..! **



# डोळे तुमचेच आहेत ना?



आजच्या ऑनलाईन जमान्यात आधार कार्डाचा आधार घेतल्याशिवाय कोणतेच काम होत नाही. ज्यावेळी ही आधार कार्डे देण्यास सुरूवात करण्यात आली त्या गोष्टीला आता किमान तीन दशके झाली. ही योजना घाई गडबडीत सुरू करण्यात आली व त्यावेळेस संगणकाचे जुजबी ज्ञान असणारी तरूण मंडळी नेमण्यात आली होती. ही मंडळी कोणी सरकारी कर्मचारीही नव्हती तर कंत्राटी पद्धतीने तालुक्यात या मंडळींचे कॅम्पस सुरू करण्यात आले होते. लोकांनी जन्मतारीख वगैरे माहितीचे पुरावे घेऊन या कॅम्पसमध्ये जायचे आणि त्यांचे जवळ जी काही माहिती आहे ती दाखवून आधार कार्ड मिळण्याचा प्रस्ताव द्यायचा अशी एक कार्यपद्धती होती. हा प्रस्ताव दाखल झाल्यानंतर काही महिन्यांनी आधार कार्ड घरपोच यायचे. त्यामध्ये अनेक चुका असायच्या, नावे चुकली होती, स्पेलिंगमध्ये चुका होत्या, त्यावरील फोटो आपलेच का? ही शंका यावी असे, सार्वजनिक ठिकाणी गुन्हेगारांचे फोटो लावतात तसे फोटो होते. या गोष्टी दुरूस्त करण्याची यंत्रणाच सुरूवातीला अस्तित्वात नव्हतीच आणि खरंतर, त्याचे महत्त्व लोकांच्या लक्षात यायलाही खूप वेळ गेला. काळ बदलला आणि आज व्यक्तीपेक्षा आधार कार्ड हीच तुमची ओळख झाली आहे. आता कंत्राटी पध्दतीने आधार कार्डातील चुका सुधारण्याची कामे वेगवेगळ्या केंद्रात चालू असतात.

या खासगी केंद्रातील काम करणारी तरूण-तरूणी संगणक तज्ज्ञ असल्यासारखी वावरत असतात. आता ही आधार कार्डे पॅन कार्डला तसेच मोबाईल नंबरलाही लिंक करणे आवश्यक झाले आहे. हे लिंक करण्याचे काम म्हणजे त्या व्यक्तीची महापरीक्षाच ठरते आहे. परवा एका केंद्रात गेलो होतो. कार्डे लिंक करण्याचे कामासाठी तुडूंब गर्दी होती. केंद्राची खोली असेल १०१२ ची. त्यात दोन विभाग. काम करणारी मंडळी वैतागलेली. एका टेबलावर अर्ज भरायचा आणि मग दुसऱ्या कंपार्टमेंट मधील मॅडम संगणकावर त्या अर्जाची माहिती घेणार! नावात चूक आहे, मोबाईल नंबर लिंक करायचाय, वगैरे तक्रारी असतात. तीन दशकांपूर्वीच वयस्कर असलेले एक गृहस्थ आता आणखी वृध्द झालेले. त्यांच्या अर्जाची तपासणी सुरू होती. कॅमेऱ्याकडे बघा! नीट बघा! डोळे मोठे करा. डोळ्याचे ऑपरेशन झाले आहे का? हे आवरण घ्या! असे म्हणून त्या वृध्द गृहस्थांना एक डोळ्यावर आवरण देऊन, त्यातील लाल दिव्याकडे डोळे मोठे करून

शशिकांत मुद्देबिहाळकर
९७६७१५२६०८

पाहण्यास सांगण्यात आले. तरीही काही परिणाम मिळेना, त्या गृहसथांचे दोन्ही डोळे, नेत्रदानातून मिळालेले डोळे होते असे समजले, तुमचे डोळे लिंक होत नाहीत, कारण हे तुमचे डोळेच नाहीत, मग कसे लिंक होणार? मग हाताचे ठसे एका मशीनवर ठेवण्यास सांगण्यात आले. पंचाहत्तरीच्या त्या गृहस्थाने थरथरणाऱ्या हाताची बोटे मशीनवर ठेवली. परंतु, त्या बोटांवरील पुसल्या गेलेल्या त्याच्या कर्मरेषाही जुळेनात. तेव्हा त्या मॅडमने त्या गृहस्थांना सांगितलं की, त्याचं आधारकार्ड त्यांच्या डोळे हाताचे बोटाचे ठसे यांच्याशी जुळत नसल्याने लिंक होणार नाही. मी त्या गृहस्थांच्या बरोबर आलेल्या त्यांच्या वृद्ध पत्नीला विचारलं, कशासाठी कार्ड लिंक करायचं आहे? तेव्हा ती माऊली म्हणाली, पोरगा मागे लागलाय, शेती विकायचीय आहे, म्हणून ही कार्डाची भानगड करायला सांगितली आहे, पण आता त्याचं डोळे बी कॅम्पात डॉक्टरांनी बसवलेत म्हणून त्यांना दिसते तरी, आणि शेतीची कामं करून-करून, हाताच्या बोटावरील रेषा कशा शिल्लक राहणार नव्हं का? आता काय, करायचं ते पोरगा बघलं! हे केल्याशिवाय जिमीन विकता येणार नाही असे तो म्हणत आहे.! ती वृध्द नवरा-बायको आल्या पावली निराश होऊन परत निघाली. मनात आले हे डिजिटल जग किती गुंतागुंतीचे आहे ना?



चार, पाच दशकांपूर्वी दिलेले अंगठ्याचे ठसे आज कसे जुळणार? आणि त्यावेळचे थकून गेलेले डोळेही, त्यावरील केलेल्या ऑपरेशन आदींमुळे मुळचे कसे राहणार? मग ते जुळले नाहीत तर, मग, माणसाची ओळखच पूसून जाते का? हा एक गंभीर प्रश्नच आहे. खरं तर, वयाच्या साठीनंतर आजच्या जगात माणसाची ओळख राहतेच कुठे? त्याचे डोळे काय आणि हाताचे बोटांचे ठसे काय, तेही त्याची साथ सोडतात, आणि ओळख विसरतात तर, माणसांचे काय. नातलगांचे काय?. आजच्या डिजिटल युगात खरंतर, त्यांनी आपलं नामधारी अस्तित्वही विसरावं हेच खरं. माणसाची निरूपयोगिता या डिजिटल युगात आता प्रकर्षाने सिद्ध होते आहे असे वाटते. तुझेच डोळे ना? हाच प्रश्न काय, अरे तूच तो आहेस का, हा प्रश्नही या डिजिटल युगात विचारला जाणे संभवनीय आहे.

# प्रकल्पांमुळे पवित्र नद्याही विषारी!

> भारतीय नद्यांना देवता मानून पूजा करण्याची पद्धत एकीकडे पहायला मिळत असताना दुसरीकडे नद्यांमध्ये स्नान करून पवित्र होण्याची भावना असते; परंतु केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचा ताजा अहवाल तमाम भारतीय आणि शासकांच्या डोळ्यांमध्ये झणझणीत अंजन घालणारा आहे. देशातल्या काही नद्या विषारी झाल्या असून त्यांचे पाणी अंगावर घेणे किंवा त्यांच्यात स्नान करणे जीवघेणे ठरू शकते, असे हा अहवाल सांगतो.

बिहारमध्ये गंगा नदीसह २२ नद्या इतक्या घाण झाल्या आहेत की त्यातील पाण्यामध्ये आंघोळ करणे धोकादायक झाले आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वार्षिक अहवालात ही बाब समोर आली. या कालावधीत विविध ठिकाणी पाण्याची चाचणी करून सविस्तर अहवाल तयार करण्यात आला आहे. गंगेसह अनेक नद्यांना सनातन धर्मात विशेष महत्त्व आहे. त्यांना जीवनदायिनीदेखील म्हणतात; परंतु त्यांचे पाणी पिण्यास योग्य नाही. बिहारमधील २२ नद्या जीवनदात्यांऐवजी रोगांचे मुख्य स्त्रोत बनत आहेत. बिहार राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने २०२३-२४ च्या वर्षाच्या वार्षिक अहवालात हा गौप्यस्फोट केला आहे. अहवालानुसार, गंगेसहित सर्व उपनद्यांच्या पाण्यामध्ये सांडपाणी आणि मलमूत्रात धोकादायक जीवाणू सापडले आहेत. या सर्व नद्यांचे पाणी आता आंघोळीसाठी योग्य राहिलेले नाही. बिहारच्या २७ जिल्ह्यांमधून जाणाऱ्या या नद्यांच्या पाण्याची ९८ ठिकाणांहून गुणवत्तेसाठी चाचणी करण्यात आली. धोकादायक जिवाणूंमुळे फेकल कॉलीफॉर्म आणि टोटल कोलिफॉर्मची मानके कोलमडल्याने परिस्थिती चिंताजनक बनली आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाने आपल्या अहवालात स्पष्टपणे म्हटले आहे की नदीचे पाणी प्रदूषित होण्याचे मुख्य कारण म्हणजे नद्यांच्या काठावर राहणाऱ्या लोकांच्या घरातील कचरा आणि मूत्र प्रक्रिया न करता नद्यांमध्ये सोडले जाते. 'नमामि गंगे' प्रकल्पांतर्गत उभारण्यात आलेले पाटण्यातील सांडपाण्यावर प्रक्रिया करणारे एकूण सहा प्रकल्प बंद आहेत आणि त्याच्या नेटवर्कवर काम सुरू आहे. त्यामुळे पाटणा शहरातील बहुतांश सांडपाणी प्रक्रिया न करताच गंगेत सोडले आहे.

मिलिंद बेंडाळे

मानकांनुसार, गंगेच्या पाण्यात जीवाणूंची संख्या पाचशे असेल, तर पाण्यात स्नान करता येते. जीवाणूंची संख्या पाच हजारांपेक्षा जास्त असेल तर ते पाणी शुद्धीकरण करूनही उपयोग होत नाही. बिहार राज्याची जीवनरेखा मानल्या जाणाऱ्या नद्यांचा राज्यातील निम्म्याहून अधिक लोकसंख्येवर परिणाम होत आहे. जाणूनबुजून किंवा नकळत लोक श्रद्धेच्या नावाखाली नदीचे पाणी वापरत असले, तरी त्याचा आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची भीती आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार, गंगा आणि तिच्या सर्व उपनद्यांच्या पाण्यात सांडपाणी आणि मलमूत्रात धोकादायक जीवाणू सापडले आहेत. या सर्व नद्यांचे पाणी आता आंघोळीसाठी योग्य राहिलेले नाही. नद्यांच्या पाण्याने २३ मानके ओलांडली आहेत. नदीच्या पाण्यात आढळणाऱ्या जीवांच्या विष्ठेमध्ये आणि लघवीमध्ये (स्युएज) जीवाणूंच्या संख्येला विष्ठा कोलिफॉर्म म्हणतात. हा जीवाणू मानवी आणि प्राण्यांच्या आरोग्यासाठी धोकादायक मानला जातो. फेकल कोलिफॉर्म व्यतिरिक्त इतर सर्व प्रकारच्या जीवाणूंच्या संख्येला टोटल कॉलिफॉर्म म्हणतात. पाटणा शहरात बांधण्यात येत असलेल्या सांडपाण्यावर प्रक्रिया करणाऱ्या प्रकल्पांची (एसटीपी) एकूण क्षमता ३५० लाख लिटर प्रति दिन आहे. सर्व एसटीपी पूर्ण क्षमतेने चालत नाहीत, तोपर्यंत गंगाजल मानवी आरोग्यासाठी स्वच्छ होऊ शकत नाही.

गंगा, सोन, पुनपुन, गंडक, बुढी गंडक, घाघरा, बागमती, कोसी, सिकरहना, महानंदा, रामरेखा, हरबोरा, धौन्स, परमार, मनुसममर, लखंडेई, दाहा, कोहरा, सिरसिया, कमला, गंगी, हरहा या नद्या प्रदूषित आहेत. बिहारमध्ये गंगा नदीचा एकूण प्रवाह ४४५ किलोमीटर आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाने एकूण ३५ ठिकाणी गंगाजलाची शुद्धता तपासली. बक्सर



ते सुलतानगंजपर्यंत गंगेच्या काठावर वसलेल्या शहरांमध्ये जलप्रदूषणाने गंभीर पातळी गाठली आहे. पाटणा येथील गांधी घाट येथे विष्ठेतील कोलिफॉर्म बॅक्टेरिया प्रमाणापेक्षा ३६ पट अधिक आढळले. सिरसिया ही बिहारमधील सर्वात प्रदूषित नदी आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाने वीरगंज चेकपोस्ट आणि मंदिराजवळील कोईरिया टोला येथून नमुने घेतले. तेव्हा फेकल कोलिफॉर्म जीवाणूंची संख्या दोन लाख ४० हजार असल्याचे आढळून आले. नागरी कचरा प्रक्रिया न करता थेट या नदीत टाकला जात आहे. आताही गंगेमध्ये प्रक्रिया न केलेले सांडपाणी मोठ्या प्रमाणावर थेट सोडले जात आहे. जलशक्ती मंत्रालयाचे राज्यमंत्री विश्वेश्वर तुडू यांनी संसदेत सांगितले की 'नमामि गंगे' कार्यक्रमामुळे गंगेतील प्रदूषणाचा भार कमी झाला आहे. २०१४ पासून केंद्राने गंगा नदी स्वच्छ करण्यासाठी ३२ हजार ९१२ कोटी रुपयांचे ४०९ प्रकल्प उभे केले आहेत.

जानेवारी २०२३ मध्ये गंगा नदीच्या पाण्याच्या नमुन्यांच्या चाचणीच्या डेटाचे विश्लेषण केले तेव्हा ७१ टक्के मॉनिटरिंग स्टेशनवर मल कोलिफॉर्मची स्थिती चिंताजनक असल्याचे आढळले. फेकल कोलिफॉर्म हा जीवाणूंचा समूह उबदार रक्ताच्या प्राण्यांच्या आतड्यांमध्ये आणि विष्ठेमध्ये आढळतो. पाण्याच्या नमुन्यांमध्ये त्याची उपस्थिती सूचित करते की, हे पाणी मानवी किंवा इतर प्राण्यांच्या विष्ठेने दूषित आहे. हे संक्रमण प्रक्रिया न केलेल्या सांडपाण्याद्वारे नद्यांपर्यंत पोहोचते. येथील प्रदूषणाचा आकडा आणखी मोठा असू शकतो. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने जानेवारी २०२३ मध्ये एकूण ९७ निरीक्षण केंद्रांपैकी केवळ ५९ स्थानकांवरून (६१ टक्के) चाचणी नमुने घेतले होते. या चाचणीचा डेटा दर्शवतो की, उत्तराखंडच्या सर्व बारा स्थानकांवर विष्ठा कोलिफॉर्म त्याच्या विहित मानक मर्यादेत आहे, तर उत्तर प्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगालची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. झारखंडमधून एकही नमुना गोळा केला गेला नाही. बिहार आणि पश्चिम बंगालमध्ये सर्व ३७ स्थानकांवर मल कोलिफॉर्मचे प्रमाण सामान्य ते खूप जास्त आढळले. उत्तर प्रदेशमधील दहापैकी पाच मॉनिटरिंग स्टेशनवर उच्च स्तरावरील मल कोलिफॉर्म आढळून आले. ४२ प्रदूषित स्थानकांपैकी ३४ अशी आहेत, जिथे मल कोलिफॉर्मची संख्या प्रति शंभर मिलीलीटरमध्ये ११ हजार एमपीएनपेक्षा जास्त आहे.

बिहारमधील सात निरीक्षण केंद्रांमध्ये मल कोलिफॉर्म सामान्यापेक्षा ३७ पट जास्त म्हणजे ९२ हजार एमपीएन प्रति शंभर मिलीलीटर आढळले. राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळे १५ दिवसांच्या अंतराने गंगा नदीच्या निरीक्षण केंद्रांमधून मॅन्युअल नमुने गोळा करतात. उत्तर प्रदेशमधील बाथिंग घाट (जाजमाऊ ब्रिज), कानपूर डाउनस्ट्रीम, मिर्झापूर डाउनस्ट्रीम, चुनार, मालवीय पुलावरील वाराणसी डाउनस्ट्रीम, गोमती नदी भुसौला आणि गाझीपूरमधील तारीघाट इथे पाणी जास्त प्रदूषित आढळले. राष्ट्रीय हरित न्यायाधीकरणाने गंगा प्रदूषणाशी संबंधित एम. सी. मेहता यांच्या अनेक याचिकांवर सुनावणी करताना सांगितले की पाच राज्यांमध्ये साठ टक्के सांडपाणी थेट गंगा नदीत सोडले जाते. गंगा नदी उत्तराखंड, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल या राज्यांमधून वाहते. या पाच राज्यांमधून प्रतिदिन १०१३९.३ दशलक्ष लीटर सांडपाणी तयार होते. यापैकी केवळ ३९५९.१६ दशलक्ष लीटर म्हणजेच ४० टक्के सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. उत्तराखंड हे एकमेव राज्य आहे, जिथे पुरेशा प्रमाणात सांडपाण्यावर प्रक्रिया केली जात आहे. उत्तर प्रदेशमध्ये गंगा आणि तिच्या नद्यांशी १३४० नाले थेट जोडले आहेत. यातील ६६.५ टक्के घाण पाणी नाल्यात जात असून, त्यावर कोणतीही प्रक्रिया होत नाही.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ गंगा नदीच्या पाण्याचे नमुने घेऊन पाच मापदंडांच्या आधारे प्रदूषणाचा अभ्यास करत



आहे. यामध्ये विरघळलेला ऑक्सिजन (डीओ), पीएच मूल्य, जैवरासायनिक ऑक्सिजन मागणी (बीओडी), फेकल कॅलिफॉर्म आणि फेकल स्ट्रोप्टोकुकी यांचा समावेश होतो. विरघळलेला ऑक्सिजन नदीतील जलचरांना किती ऑक्सिजन उपलब्ध आहे हे दर्शवतो तर पीएच मूल्य नद्यांमधील पाणी जलीय जीवांद्वारे वापरले जाऊ शकते का हे सूचित करते. सायन्स डायरेक्ट जर्नलनुसार, उच्च बीओडी म्हणजे पाण्यातील सूक्ष्म जीवांना सेंद्रिय पदार्थ काढून टाकण्यासाठी अतिरिक्त ऑक्सिजनची आवश्यकता असते. पाण्यात असलेले ऑक्सिजन घटक कमी होत आहेत. पाण्यामध्ये प्रदूषण असल्याचेही बीओडी दाखवते. नॅशनल क्लीन गंगा मिशन अंतर्गत गंगेमधील मॅन्युअल मॉनिटरिंग स्टेशन्सची संख्या १३४ असावी; परंतु सध्या फक्त ९७ मॉनिटरिंग स्टेशन्स अस्तित्वात आहेत. गंगा नदीतील प्रदूषण निरीक्षण अधिक प्रभावी व्हायला हवे. मार्गदर्शक तत्त्वांमध्ये शाश्वत नद्यांचे २५ मापदंडांवर परीक्षण करण्यात यावे, असे म्हटले होते. ही मार्गदर्शक तत्त्वेदेखील अधिसूचित करण्यास सांगितले होते; परंतु आजपर्यंत ही मार्गदर्शक तत्त्वे अधिसूचित केलेली नाहीत. या पार्श्वभूमीवर प्रदूषणाची किती काळजी घेणे आवश्यक आहे, हे लक्षात येते. **

## वाचनीय, प्रेरक आणि संग्राह्य

# क्रिप्टोकरन्सी

क्रिप्टोकरन्सी हे डॉ. गिरीश वालावलकर लिखित पुस्तक पुण्याच्या मायमिरर पब्लिशिंग हाऊसने देखण्या रूपात प्रकाशित केले आहे. डॉ. गिरीश यांनी ''प्रस्तावना'' मध्ये या पुस्तकाच्या लेखनाविषयी आपले मनोगत व्यक्त केले आहे. त्यांच्यामते, संपूर्ण जगाच्या आर्थिक व्यवहार करण्याच्या पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल करण्याची क्षमता क्रिप्टोकरन्सी या अत्यंत नव्या संकल्पनेतून निर्माण झालेल्या आधुनिक संगणकीय चलनामध्ये आहे. क्रिप्टोकरन्सी बाजारात आल्याला आता तेरा वर्षे होतील. जगाच्या आणि भारताच्या अर्थकारणात ती लक्षणीय स्थान मिळवते आहे. सातोशी नाकामोटो याने शोधलेल्या तंत्रज्ञानाला ''बिटकॉइन'' हे नाव दिले होते. या तंत्रज्ञानामुळे जगाच्या व्यवहारात क्रिप्टोकरन्सीला सुरुवात झाली. हे सारे गिरीश यांनी एकूण चोवीस प्रकरणांतून वाचकांसमोर उलगडले आहे. संपदा जाधव यांचे रंगीत मुखपृष्ठ आशयाला सुयोग्य आणि अतिशय देखणे झाले आहे.





पहिल्या प्रकरणात ''नव्या चलनाचं वळण'' स्पष्ट केले आहे. ''अंकांच्या स्वरूपातलं आणि इंटरनेटच्या माध्यमातून संगणकाद्वारे वापरलं जाणारं आधुनिक चलन म्हणजे 'क्रिप्टोकरन्सी' किंवा 'आभासी चलन'! हे चलन कोणत्याही देशाशी किंवा बँकेशी संबंधित नसते. या चलनाच्या निर्मितीवर कोणतेही बंधन नसते. हे चलन वापरणारा स्वतःच संगणकावर ते निर्माण करू शकतो आणि स्वनिर्मित चलनाद्वारे आंतरराष्ट्रीय पातळीवरसुद्धा आर्थिक व्यवहार करू शकतो. हे चलन वापरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडे स्वतःची टाकसाळ असते. स्वतःची क्रिप्टोकरन्सी निर्माण करण्याच्या प्रक्रियेला 'मायनिंग' असे म्हटले जाते. जानेवारी, २००९ मध्ये ऍडम बॅकला सातोशी नाकामोटोचा ई-मेल मिळाला आणि त्याच्या संगणकावर अल्पावधीतच ५० बिटकॉइन जमा झाली होती. हे सविस्तरपणे गिरीश यांनी स्पष्ट केले आहे. नंतरच्या प्रकरणांतून जगातील विविध देशांतील संगणकतज्ज्ञांनी केलेल्या प्रयत्नांतून क्रिप्टोकरन्सी निर्मितीची प्रक्रिया कशी होत गेली हे स्पष्ट होते.

प्रा.शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

बिटकॉइन्स निर्माण करण्यासाठी सातोशी नाकामोटेने जे तंत्रज्ञान विकसित केले होते, त्याला त्याने ''ब्लॉकचेन'' हे नाव दिले. संगणकावर निर्माण केलेले संगणकीय चलन म्हणजेच क्रिप्टोकरन्सी. त्याद्वारे झालेले सर्व व्यवहार संगणकावरच छोट्या जागेत साठवले जातात. त्याला ''ब्लॉक'' असे म्हणतात. निर्माण झालेले प्रत्येक बिटकॉइन आणि क्रिप्टोकरन्सीचे प्रत्येक चलन आणि त्यामार्फतचा झालेला प्रत्येक आर्थिक व्यवहार यांची ब्लॉकवर नोंद होते. अशा व्यवहारांची नोंद असलेले ब्लॉक्स एकमेकांना जोडले जाऊन त्यांची जी शृंखला बनते तिला ''ब्लॉकचेन'' म्हणतात. क्रिप्टोग्राफी तंत्रामुळे संगणकावरील माहिती आणि संवाद हे अपेक्षित व्यक्तींपुरतेच मर्यादित राहतात. त्यामुळे संपूर्णपणे खाजगीपणा आणि सुरक्षितता जपली जाते.

क्रिप्टोकरन्सीचा वापर सुरुवातीच्या काळात अमली पदार्थांच्या खरेदी-विक्रीसाठी केला जात असल्याने, अनेक देशांतील सरकारांनी त्यापैकी काहींवर कायदेशीर कारवाई केली होती. नंतरच्या काळात क्रिप्टोकरन्सीची व्याप्ती आणि प्रगती वेगाने कशी होत गेली हे सविस्तरपणे मांडले गेले आहे.२०२२ मध्ये सर्वात जास्त मागणी असलेल्या, दहा विविध क्रिप्टोकरन्सींची माहिती पान १३५ वर दिली आहे. क्रिप्टोकरन्सीविषयी भारतामध्ये सध्या उत्सुकतेचे वातावरण आहे. भारतात क्रिप्टोकरन्सीच्या वापरावर कोणतेही प्रतिबंध नाहीत. मात्र तिच्या वापराबद्दल अजूनही कोणतीही नियमावली किंवा मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केलेली नाहीत. २०२१ च्या नोव्हेंबर महिन्यापर्यंत सुमारे दीड ते दोन कोटी भारतीय लोकांनी क्रिप्टोकरन्सीमध्ये ८० हजार कोटी रुपये एवढी प्रचंड गुंतवणूक केली आहे. यामध्ये प्रचंड नफा कसा मिळू शकतो हेही गिरीश यांनी सविस्तरपणे सोदाहरण मांडले आहे. विशेष म्हणजे क्रिप्टोकरन्सीचा निर्माता सातोशी नाकामोटो नेमका कोण होता हे कधीही समोर आलेले नाही. एक व्यक्ती म्हणून त्याची ओळख कायमच संदिग्ध राहील. क्रिप्टोकरन्सीधारकाने कोणती काळजी घेणे आवश्यक आहे, हेही लेखकाने स्पष्ट केले आहे.

डॉ. गिरीश वालावलकर यांनी या पुस्तकाद्वारे नवीन आणि अवघड विषय अतिशय सोप्या आणि रंजक मराठीत, वाचकांसमोर मांडला आहे. त्याबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन! पुस्तकाच्या शेवटी आणि मलपृष्ठावर लेखकाचा परिचय, त्यांच्या रंगीत छायाचित्रासह करून दिला आहे. पुस्तकाचे शेवटी सविस्तर संदर्भसूची देण्यात आली आहे.हे पुस्तक वाचनीय, मार्गदर्शक आणि संग्राह्य झाले आहे. **

पुस्तकाचे नाव : क्रिप्टोकरन्सी
लेखक : डॉ. गिरीश वालावलकर. प्रकाशक : मायमिरर पब्लिशिंग हाऊस, ३६, वेदांतगड, तुळशीबाग कॉलनी, सहकारनगर क्र.२. पुणे -९.
मोबा. ९४२२३१६६८९
प्रथमावृत्ती : सप्टेंबर,२०२२.
पृष्ठे:२४० किंमत : रुपये २९९/-

निवडक

## पाकचा गॅरी कर्स्टनवर डोळा

**लाहोर :** पाकिस्तान क्रिकेट बोर्डाची लाहोरमध्ये एक बैठक झाली. या बैठकीत पाकिस्तान संघासाठी दोन विदेशी प्रशिक्षक नेमण्याबाबत चर्चा झाली. सध्या पाकिस्तान संघाला हेड कोच नाही. पीसीबी सध्या गॅरी कर्स्टन आणि जेसन गिलेस्पी यांच्याशी चर्चा करत आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्ड हे एकाच विदेशी कोचवर अवलंबून राहणार नाही. पीसीबी हे स्प्लिट हेड कोचसाठी उत्सुक आहे. जर या दोघांनी प्रस्ताव स्विकारला तर ते वेगवेगळ्या प्रकारामध्ये पाकिस्तान संघाला मार्गदर्शन करतील.

## त्यांना ऑस्करच दिला पाहिजे

**बेंगळुरू:** आयपीएल स्पर्धेत शुक्रवारी झालेल्या सामन्यात कोलकाताने बेंगळुरू विरुद्ध ७ गड्यांनी विजय मिळवला. दरम्यान, एम चिन्नास्वामी स्टेडियम वर झालेल्या या सामन्यावेळी एक घटना सर्वाधिक चर्चेचा विषय ठरली. ती घटना म्हणजे कोलकाताचा मार्गदर्शक गौतम गंभीर आणि बेंगळुरूचा स्टार फलंदाज विराट कोहली यांची झालेली भेट. त्याचवेळी शास्त्री म्हणाले, 'ही घटना फेअरप्ले पुरस्कारासाठी पात्र आहे'. तर गावसकर गंमतीने म्हणाले, 'फक्त फेअरप्ले नाही, तर त्यांना ऑस्कर द्यायला हवा'.

## बाबर पुन्हा पाकचा कर्णधार?

**लाहोर :** बाबरला पुन्हा एकदा पांढऱ्या चेंडूच्या कर्णधारपदाची ऑफर देण्यात आली आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांनी या आठवड्याच्या सुरुवातीला बाबरची भेट घेऊन ही ऑफर दिली होती. बाबरने अद्याप हा प्रस्ताव स्वीकारलेला नाही. एकदिवसीय विश्वचषक २०२३ नंतरच बाबर आझमने तिन्ही फॉरमॅटचे कर्णधारपद सोडले आहे. त्याने पीसीबीला सांगितले की, जर पुनरागमनाचा विचार करायचा असेल तर तिन्ही फॉरमॅटमध्ये कर्णधार म्हणून नियुक्त करावे.

## सिंधूचे आवाहन संपुष्टात

**माद्रिद :** भारताची शटलक्वीन पी.व्ही. सिंधूचे माद्रिद ओपन बॅडमिंटन स्पर्धेतील आव्हान शुक्रवारी संपुष्टात आल आहे. थायलंडच्या सुपानिदा केटथाँगने सिंधूवर तीन गेममध्ये (२४-२६, २१-१७, २२-२०) रोमहर्षक विजय मिळवला आणि उपांत्य फेरीत प्रवेश केला. पी.व्ही. सिंधू-सुपानिदा केटथाँग यांच्यामधील लढतीत पहिल्या गेममध्ये दोन्ही खेळाडूंमध्ये कडवी झुंज पाहायला मिळाली. सिंधूने अखेरच्या क्षणी आपला खेळ उंचावला आणि २६-२४ असा विजय मिळवत १-० अशी आघाडी घेतली.

## बोपण्णाकडून पेसची बरोबरी

**मियामी :** भारताचा ४४ वर्षीय अनुभवी टेनिसपटू रोहन बोपण्णा याने भारताचा महान खेळाडू लिएंडर पेसच्या विक्रमाची बरोबरी केली. रोहन बोपण्णा याने मॅथ्यू एब्डेन याच्या साथीने मियामी ओपन टेनिस स्पर्धेच्या पुरुष दुहेरीत अंतिम फेरीत प्रवेश केला. याचसोबत नऊ एटीपी मास्टर्स टेनिस स्पर्धेची अंतिम फेरी गाठणारा रोहन बोपण्णा हा लिएंडर पेसनंतरचा दुसरा भारतीय टेनिसपटू ठरला आहे, हे विशेष म्हणावे लागेल.

### अलिबाग क्रीडा भवन मैदानावर

# दोन दिवस क्रिकेटचा थरार

**अक्षया प्रशांत नाईक यांच्या हस्ते स्पर्धेचा शुभारंभ**

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर चषकाचा मानकरी कोण ठरणार**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

गोविंदबंदर येथील नालंदा बुध्दविहार आयोजित मिलींद जाधव, मनिंदर बाडवाल, कपिल गायकवाड यांच्यावतीने अलिबाग शहरातील क्रीडा भवनच्या प्रांगणात दोन दिवस क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चषक २०२४ क्रिकेट स्पर्धेचा शुभारंभ अक्षय्या प्रशांत नाईक व अलिबागच्या माजी नगरसेविका संजना किर यांच्या हस्ते शनिवारी (दि.३०) करण्यात आला.







यावेळी विकास दामले, विजय पाटील, समिर जाधव, मिलींद जाधव, मनींदर बाडवाल, कपिल गायकवाड आदी मान्यवर, खेळाडू, क्रिकेट प्रेमी व प्रेक्षक उपस्थित होते.

गेल्या दोन वर्षापासून मिलींद जाधव, मनिंदर बाडवाल, कपिल गायकवाड यांच्या पुढाकाराने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चषक स्पर्धेची परंपरा जपली आहे. शनिवारपासून सुरु झालेल्या या स्पर्धेत १६ संघ सहभागी झाले आहेत. अलिबाग तालुक्यातील ग्रामीण शहरी भागातील संघाचा यामध्ये समावेश आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पुष्पहार घालून त्यांना अभिवादन करून स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला. या स्पर्धेतील अंतिम सामना रविवारी (दि.३१) सायंकाळी होणार आहे. त्यानंतर अंतिम विजेत्या संघाला गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेतील प्रथम क्रमांकाला रोख ५१ हजार रुपये व चषक, द्वितीय क्रमांकाला ३१ हजार रुपये व चषक देऊन सन्मानित केले जाणार आहे. तसेच, उत्कृष्ट फलंदाज, उत्कृष्ट गोलंदाज व सामनवीराला आकर्षक बक्षीस देऊन गौरविले जाणार आहे. भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधत ही स्पर्धा आयोजित केली असून ही स्पर्धा पाहण्यासाठी प्रेक्षकांनी क्रीडा भवन समोर गर्दी केली. स्पर्धेला पहिल्या दिवसापासून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून आले.

# महाराष्ट्राच्या संघांचा झंझावात

**'खो-खो'च्या दोन्ही गटांत वर्चस्व**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

नवी दिल्ली येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय खो-खो स्पर्धेमध्ये महाराष्ट्राच्या दोन्ही (पुरुष व महिला) संघांनी प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवत शुक्रवारचा दिवस गाजवला आहे. महाराष्ट्राच्या पुरुषांच्या संघाने मणिपूरवर, तर महिला संघाने मध्य भारत संघाचा पराभव करत शानदार कामगिरी केली.

पहारगंज रेल्वे कॉलनी येथील करमाळी सिंग क्रीडांगणात ही स्पर्धा सुरू आहे. सकाळच्या सत्रात रंगलेल्या पुरुष विभागातील सामन्यात महाराष्ट्र संघाने नाणेफेक जिंकून संरक्षण स्वीकारले. प्रथम संरक्षण करताना महाराष्ट्राकडून ऋषिकेश मुर्चावडे (१.५० मि. संरक्षण), प्रतीक वाईकर (२ मि. संरक्षण व १ गुण), ऋषभ वाघ (२.४० मि. संरक्षण व १ गुण), सौरभ घाडगे (३ गुण) यांनी छान खेळ केला. आक्रमणात महाराष्ट्राने १५ गुण मिळवले. मध्यंतरापर्यंत महाराष्ट्राकडे २० (३०-१०) गुणांची आघाडी होती. दुसऱ्या डावात निखिल सोडिये (२ मि. संरक्षण), अक्षय भांगरे (१.४० मि. संरक्षण), विजय शिंदे (१.३० मि. संरक्षण), अक्षय मासाळ (१.४० मि. संरक्षण) यांनी चांगला खेळ करत महाराष्ट्राला एक डाव १० (३०-२०) गुणांनी विजय मिळवून दिला. मणिपूरतर्फे धनंजय (१ मि. संरक्षण व २ गुण) यांनी धमक दाखवली. साखळी सामन्यांमध्ये 'ब' गटात समावेश असलेल्या महाराष्ट्राच्या संघाने अव्वल कामगिरी केली आहे.

### महिला विभागात एकतर्फी विजय

**महिला विभागातील 'अ' गटातील दुसऱ्या सामन्यात महाराष्ट्राने मध्य भारतवर एक डाव ३० (४०-१०) गुणांनी एकतर्फी विजय मिळवला. महाराष्ट्राच्या संघाकडे मध्यांतराला ४०-४ अशी आघाडी होती. महाराष्ट्राकडून अश्विनी शिंदे (४ मि. संरक्षण), प्रियांका इंगळे (२.२० मि. संरक्षण व ८ गुण), काजल भोर (३.४० मि. संरक्षण व ८ गुण), गौरी (२.४० मि. संरक्षण व ४ गुण) यांनी दमदार खेळ केला. मध्य भारतकडून सेजल (१ मि. संरक्षण) व रोहिणी (४ गुण) यांनी प्रभावी कामगिरी केली.**



# आदेश कोळीचे क्रीडा स्पर्धेत यश

**। उरण । प्रतिनिधी ।**

हरियाणा पंचकुला येथे स्पेशल ऑलिम्पिक भारत नॅशनल सायकलिंग स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्यामध्ये महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व आदेश राम कोळी यांनी केले. आदेश राम कोळी हा उरण येथील हनुमान कोळीवाडातील रहिवासी असून स्वामी ब्रम्हानंद सी बर्ड विशेष शाळेत शिकत आहेत. त्याने या स्पर्धेत दोन किलोमीटर सायकलिंग स्पर्धेमध्ये रौप्य व तीन किलोमीटर सायकलिंग स्पर्धेमध्ये कांस्य पदक पटकाविले आहे.



यावेळी भारतातून एकूण ४०० खेळाडू सहभागी झाले होते. त्यातून आदेश कोळी याने या क्रीडा प्रकारात यश प्राप्त केले आहे. आदेश कोळी याच्यावर सर्वच स्तरातून कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शाळेच्या ट्रस्टी शिरीष पुजारी, शिक्षिका चारू शहा, छाया, मधुर उपाध्याय, पल्लवी परदेशी, राकेश म्हात्रे, मानसी पांचाळ, प्रशांत कदम, गणेश जाधव यांनी आदेश कोळीचे कौतुक केले. तसेच, आदेश कोळी याला गोपाळ म्हात्रे, दयानंद पवार यांनी मार्गदर्शन केले.

## रिंकूने मानले कोहलीचे आभार

**। बेंगळुरू । वृत्तसंस्था ।**

आयपीएलच्या दहाव्या सामन्यात कोलकाता नाईट राडयर्सने रॉयल चॅलेंजर बेंगळुरूचा ७ विकेट्सनी पराभव केला. केकेआरने यंदाच्या हंगामातील होम टीमच्या विजयाचा सिलसिला ब्रेक केला. दरम्यान, सामना झाल्यावर विराट कोहलीने केकेआरच्या रिंकू सिंहची भेट घेतली. त्यावेळी विराट कोहलीने रिंकूला एक बॅट गिफ्ट केली. तसेच, रिंकू सिंहने आपल्या सोशल मीडिया हँडलवरून विराट कोहलीचे सल्ला आणि गिफ्टसाठी आभार मानले आहे.

# मुंबईची धुरा पुन्हा रोहित शर्माकडे?

**दोन सामन्यांतील पराभवानंतर हार्दिकने घेतला ब्रेक**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई इंडियन्सच्या टीम मॅनेजमेंटने संघाचा कर्णधार बदलण्याचा निर्णय घेत नेतृत्वाची धुरा रोहित शर्मा ऐवजी हार्दिक पांड्याकडे दिली आहे. मात्र, हार्दिक पांड्याला यंदाचे आयपीएल चांगले गेलेले नाही. एकीकडे क्रिकेट फॅन्सकडून होणारी टीका आणि दुसरीकडे मुंबई इंडियन्सचे दोन जिव्हारी लागणाऱ्या पराभवचा सामना हार्दिक पांड्याने केला आहे.

दरम्यान, हार्दिक पांड्याबाबत मोठी माहिती समोर आली आहे. हार्दिक पांड्याने हैदराबाद विरुद्धच्या सामन्यानंतर ब्रेक घेतला असल्याची माहिती समोर आली आहे. मुंबईचा पुढील सामना १ एप्रिल रोजी राजस्थान रॉयल्स विरुद्ध होणार आहे.




हार्दिक पांड्या मुंबईचा कर्णधार झाला तेव्हापासून त्याला टीकेचा सामना करावा लागत आहे. रोहित शर्माच्या जागी हार्दिककडे नेतृत्त्व देण्यात आलं होतं. रोहित शर्माचे चाहते हार्दिक पांड्यावर टीका करताना दिसून आले आहेत. याशिवाय गुजरात टायटन्सच्या समर्थक प्रेक्षकांनी देखील अहमदाबादमध्ये हार्दिक पांड्या विरोधात नारेबाजी केली होती.

दरम्यान, सनरायजर्स हैदराबादच्या विरोधातील सामन्यानंतर मुंबईचा संघ दिल्लीत परतल्यानंतर हार्दिक पांड्या लगेचच त्याच्या मुंबईतील घरी निघून गेला आहे. हार्दिक पांड्या पुन्हा आराम करुन राजस्थान विरुद्धच्या सामन्यासाठी तयार होईल. तसेच, त्याने संघासोबत राहण्याऐवजी कुटुंबियांसोबत वेळ घालवण्यासाठी ब्रेक घेतल्याची माहिती आहे.

# हार्दिक पांड्याची अश्विनकडून पाठराखण

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इंडियन प्रीमियर लीग २०२४ स्पर्धा सुरू आहे. पण अशातच सध्या मुंबई इंडियन्सचा संघ सातत्याने चर्चेत येत आहे. रोहितला काढून हार्दिककडे मुंबईच्या नेतृत्वाची धूरा सोपवल्याने चाहते मात्र नाराज झाले आहेत. हार्दिकला मोठ्या प्रमाणात ट्रोलही केले जात आहे. त्यामुळे आता हार्दिकच्या पाठिंब्यासाठी काही दिग्गज खेळाडूंबरोबरच सेलिब्रेटी उतरले आहेत.



खरंतर रोहितच्या नेतृत्वात मुंबईने गेल्या १० वर्षात ५ वेळा आयपीएलचे विजेतेपद जिंकले आहे, असे असताना त्याला काढून हार्दिककडे ही जबाबदारी सोपवल्याने चाहते नाराज आहेत. हार्दिक २०१५ ते २०२१ पर्यंत मुंबई इंडियन्सकडून खेळला होता, परंतु २०२२ मध्ये त्याला करारमुक्त करण्यात आले होते. त्यावेळी गुजरातने त्याला संघात घेत कर्णधारही केले. त्याच्या नेतृत्वात गुजरातने २०२२ मध्ये विजेतेपद मिळवले, तर २०२३ मध्ये उपविजेतेपद मिळवले. मात्र, त्यानंतर मुंबई इंडियन्सने त्याला पुन्हा संघात घेत नेतृत्व दिले. इतकेच नाही, तर अनेक प्रसार माध्यमांमध्ये अशीही माहिती देण्यात आली की, हार्दिकने मुंबईत पुन्हा येण्यासाठी नेतृत्व देण्याची अट ठेवली होती. या सर्व घटनांमुळे मुंबई इंडियन्स आणि रोहित शर्माचे चाहते दुखावले असून त्यांनी हार्दिकला मोठ्या प्रमाणात ट्रोल करणे सुरू केले आहे.

यावेळी आर अश्विनने म्हटले आहे की, भारतात अशाप्रकारे फॅन वॉर व्हायला नको. त्याने आपल्या युट्युब चॅनेलवर बोलताना दुसऱ्या देशांचे उदाहरण दिले असून विचारले की, जो रुट आणि जोस बटलर किंवा जो रुट आणि जॅक क्रॉली किंवा स्टीव्ह स्मिथ आणि पॅट कमिन्स अशा खेळाडूंच्या चाहत्यांमध्ये कधी भांडण झालेले पाहिले आहे का? त्याचबरोबर तो म्हणाला, फॅन वॉर अशा चूकीच्या मार्गावर जायला नको. हे पण लक्षात ठेवले पाहिजे की, हा खेळाडू देशाचे प्रतिनिधित्व करत आहे. असे असताना एका क्रिकेटपटूवर निशाणा साधण्यात काय अर्थ आहे? हेच समजत नाही की जर आपल्याला एखादा खेळाडू आवडत नसेल आणि जर एखाद्या खेळाडूवर टीका करत असू तर त्याच्या संघाने त्याबाबत स्पष्टीकरण का द्यावे, आपण असं का वागत आहोत, जसे की हे आधी कधीच झालेले नाही.

# लोधिवली येथे कनिष्ठ गटाची चाचणी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगडा जिल्ह्याचा ज्युनियर (१६ वर्षांखालील) मुलांचा क्रिकेट संघ निवडण्यासाठी १ व २ एप्रिल रोजी खालापूर तालुक्यातील लोधीवली येथील रिलायन्स कॉलनीतील अंबानी स्कूल मैदानावर निवड चाचणी घेतली जाणार आहे.

या चाचणीतून रायगड जिल्ह्याचा १६ वर्षांखालील मुलांचा संघ निवडण्यात येणार आहे. हा संघ महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या आमंत्रितांच्या स्पर्धेत सहभागी होईल, अशी माहिती रायगडा जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी दिली आहे. रायगड जिल्ह्यातील रहिवाशी असलेल्या खेळाडूंनाच या निवड चाचणीत भाग घेता येणार असून त्यासाठी आधार कार्ड आणि वयाचा दाखला सादर करावा लागणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

निवड चाचणीच्यावेळी खेळाडूंनी क्रिकेटचा सफेद गणवेश परिधानकरून आणि स्वतःचे क्रिकेट साहित्य घेऊन १ एप्रिल रोजी सकाळी साडेआठ वाजता लोधिवली येथील मैदानावर हजर राहायचे आहे.

तसेच, निवड चाचणी शुल्क २०० रुपये आकारण्यात येणार असून १ सप्टेंबर २००८ नंतर जन्मलेले खेळाडूच यात भाग घेऊ शकणार आहेत. अधिक माहितीसाठी अध्यक्ष चंद्रकांत मते मोबा. ०९८२२८३६४४२, प्रशांत ओक मोबा. ०९८२२४२२६७६, किरीट पाटील मोबा. ०८८९८०१५२८५ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# रायगड क्रिकेट संघात तनिष्काची निवड

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

रायगड क्रिकेट असोसिएशनतर्फे निवडण्यात आलेल्या महिलांच्या खुल्या संघात आर.सी.एफ. शाळेच्या तनिष्का वारगे हिची निवड करण्यात आली आहे. ही निवड रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या निवड यादीद्वारे प्रसिद्ध करण्यात आली आहे.

संघाचे सर्व शिबीर पुणे येथे सुरू आहेत. यावेळी निवड झालेल्या सर्व खेळाडूंचे रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते, प्रकाश पावसकर व सर्व सदस्यांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.



तसेच, तनिष्का ही सलग दोन वर्ष जगदीश ढगे अकॅडमी अलिबाग येथे ढगे सरांच्या मार्गदशनाखाली लेदर बॉल क्रिकेटचे प्रशिक्षण घेत आहे.

रायगडसाठी अलिबागची विद्यार्थीनी खेळणार असल्याने तिचा व तिच्या पालकांचा अभिमान वाटतो. यापुढे इतर मुलामुलींना प्रशिक्षण मिळावे यासाठी आर.सी.एफ. शिक्षण संकुलात मार्गदर्शन शिबीर आयोजित करणार असल्याचे प्राचार्या संविधा जाधव यांनी सांगितले.

# सात्विक-चिरागने रचला इतिहास

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**भारताची स्टार बॅडमिंटनपटूंची जोडी सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांची यशस्वी घौडदौड सुरू असून आता त्यांनी आणखी एक मोठा विक्रम केला आहे. त्यांनी सायना नेहवालचा विक्रम मोडला आहे.**

सात्विकसाईराज आणि चिराग यांची जोडी पुरुष दुहेरीच्या जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकावर आहे. त्यांनी अव्वल क्रमांकावर गेले १० आठवडे आपले स्थान कायम राखले आहे. त्यामुळे सात्विक आणि चिराग पहिलेच भारतीय बॅडमिंटनपटू ठरले आहेत, ज्यांनी १० आठवडे जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान टिकवून ठेवले आहे. यापूर्वी सायना नेहवालने १८ ऑगस्ट ते २१ ऑक्टोबर २०१५ दरम्यान सलग ९ आठवडे जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांक टिकवला होता.



विशेष म्हणजे सात्विक आणि चिराग ही पहिली भारतीय पुरुष बॅडमिंटन जोडी आहे, ज्यांनी जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांक पटकावला आहे. सध्या सात्विक आणि चिराग यांचे १,०२,३०३ गुण आहेत. त्यांच्यात आणि दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या दक्षिण कोरियाच्या कँग मिन ह्युक आणि सेओ सेउंग जे या जोडीमध्ये पाचहजार पॉइंट्सचा फरक आहे. सात्विकसाईराज आणि चिराग यांनी गेल्या दोन वर्षात अनेक मोठ्या स्पर्धा जिंकून भारताचा तिरंगा मानाने फडकावला आहे. त्यांनी इंडिया ओपन २०२२ स्पर्धा जिंकल्यानंतर कामगिरीत सातत्य ठेवले आहे. त्यांनी भारताला ऐतिहासिक थॉमस चषक जिंकून देण्यात मोलाचा वाटा उचलला होता. तसेच, त्यांनी राष्ट्रकूल स्पर्धेमध्ये, आशियाई क्रीडा स्पर्धेतही सुवर्णपदक जिंकले आहे. याशिवाय त्यांनी अनेक स्पर्धा जिंकल्या. त्यांनी नुकतेच फ्रेंच ओपन २०२४ स्पर्धेचेही विजेतेपद जिंकले. तसेच यंदाच्या वर्षात त्यांनी आत्तापर्यंत तीनवेळा अंतिम फेरीतही स्थान मिळवले.

कु.साई दिपक सुद
जन्मदिनांक ३० मार्च
४ था वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक
आई, बाबा, काका, आत्या, आजी, आजोबा

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)